# संस्कृत भाषेचा उलगडा

१ संस्कृत भाषा प्रथम शिकावयाला लागले म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्याला एक मोठा चमत्कार वाटतो. तो चमत्कार म्हणजे संस्कृतातील द्विवचनाचा. मराठीत दोनच वचने, एकवचन व अनेकवचने. संस्कृतात पहाव तो आणिक एक तिसरे वचन म्हणजे द्विवचन आढळते. लहानपणी अमरकोशाबरोबर रूपावलीला प्रारंभ करताना रामौ या द्विवचनावर जेव्हा मी आलो तेव्हा अमरकोश पढविणाऱ्या शास्त्रीबोवांना प्रश्न केला की, रामौ हे काय आहे ? बोवांनी सांगितले की, रामौ म्हणजे जे हे ते दोन राम, याला द्विवचन म्हणतात. यावर दुसरा प्रश्न केला की, तीन रामांना काय म्हणतात? बोवा म्हणाले, रामा: म्हणतात, यावर पुन्हा प्रश्न केला की, चार रामांना काय म्हणतात? यावर संतापाने थोत्रीत लगावून बोवा म्हणाले, तुझे डोबल म्हणतात!!! येणेप्रमाणे शंकासमाधान झाल्यावर राम: रामौचा घोष उदात्त स्वरात पुन्हा सुरू झाला. तेव्हापासून या द्विवचनाचा चमत्कार माझ्या मनात वारंवार घोळत आहे. संस्कृतात द्विवचन काय म्हणून असावे आणि मराठीत काय म्हणून नसावे ? मुळातच संस्कृतात द्विवचन कसे उत्पन्न झाले? संस्कृत भाषा बोलणाऱ्या प्राचीन समाजाची अशी कोणती मनोवृत्ती असावी की, दोन पदार्थ दाखविण्याकरिता त्याने शब्दांची निराळी रूपे बनवावी? इत्यादी प्रश्न माझ्या मनात कित्येक वर्षे घोळत आहेत. तो घोळणा आज कागदावर उतरतो.

२ वचन म्हणजे शब्दानी संख्या दाखविणे. संख्या दाखविणारे शब्द असू शकतील किंवा प्रत्यय असू शकतील. ज्या भाषात संख्या प्रत्ययांनी दाखविली जाते त्या भाषा सप्रत्यय भाषा आणि ज्या भाषात संख्या स्वतंत्र शब्दांनी दाखविली जाते त्या अप्रत्यय भाषा. हजारो वर्षांपूर्वी अत्यंत रानटी स्थितीत आर्य असताना ते अप्रत्ययभाषा बोलत व एक, दोन, तीन हे संख्यावाचक शब्द वस्तूंच्या पुढे उच्चारून वस्तूंची संख्या दाखवीत. हजारो वर्षांनंतर आर्य सप्रत्यय भाषा बोलू लागले, तेव्हा एकही संख्या दाखविण्याकरिता ते एकवचनाचा प्रत्यय शब्दाला लावू लागले, दोन ही संख्या दाखविण्याकरिता द्विवचनाचा प्रत्यय लावू लागले आणि तीनही संख्या दाखविण्याकरिता त्रिवचनाचा प्रत्यय लावू लागले. वस्तुत: आपल्या सध्याच्या अर्वाचीनदृष्टीने पहाता एकाहून अधिक संख्येला आपण अनेक हे विशेषण लावतो. सप्रत्यय भाषा बोलण्याच्या पायरीला आल्यावर आर्यांना ही बाब माहीत झालेली होती. कारण अनेक व अन्य हे दोन अती जुनाट शब्द सप्रत्ययभाषा बोलण्याच्या सुमारास आर्यभाषेत विद्यमान होते. दोन म्हणजे अनेक ही बाब यद्यपि सप्रत्यय भाषा बोलू पाहणाऱ्या आर्यांना माहीत होती, तत्रापि पूर्वीचा अप्रत्यय भाषा बोलण्याच्या वेळचा भाषण संप्रदाय त्यांना, इच्छा असती तरीही सोडता आला नसता व आला नाही. असे दिसते की, अप्रत्यय भाषा बोलण्याच्या प्रारंभास आर्यांना किंवा आर्यांच्या

पूर्वजांना फक्त तीनपर्यंत अंक मोजता येत होते. सध्या जसा दशम आपण व्यवहार करतो तसा तीनने त्या रानटी स्थितीत आर्यपूर्वज व्यवहार करीत. सर्व जग तीनचे. भूर, भुवर, स्वर असे तीन लोक, अ उ म् असा त्र्यक्षरी ओम्, स्वर्ग, पाताळ आणि पृथ्वी अशी तीन जगे, स्वाहा, स्वधा, वषट् असे तीन कार, इत्यादी अनेक त्रिके जीं वैदिक वाङ्मयात दिसतात त्यांचे मूळ रानटी स्थितीतील फक्त तीनपर्यंत संख्या मोजण्याची आर्यांची ऐपत होय. त्या काळी संख्या मोजण्याची इतकी संकुचित ऐपत असल्यामुळे व भाषा प्रत्ययाशिवाय बोलत असल्यामुळे व एक वस्तू दाखवावयास वस्तू शब्दाच्या पुढे एक या अर्थाचा शब्द रानटी आर्य उच्चारीत, दोन वस्तू दर्शविण्याकरिता दोन या अर्थाचा शब्द रानटी आर्य उच्चारीत आणि तीन वस्तू दाखवावयाच्या असल्यास वस्तू शब्दापुढे तीन या अर्थाचा शब्द घालीत आणि इथे घोडे थांबे. चार या अर्थाचा किंवा चारांहून जास्त संख्या दर्शविणारा शब्द भाषेत नसल्यामुळे सर्व व्यवहार त्रिकाच्या घडामोडीवर चाले. अशा त्रैकावस्थेत हा रानटी समाज असता, बाह्य कारणाचा आघात होऊन, तो रानटी समाज प्रत्यय भाषा बोलू लागला आणि सप्रत्यय अशी तीन वचने, कारण तीनपर्यंतच संख्या माहीत होती, त्याच्या बोलण्यात सहजच येऊ लागली. चार किंवा पाचपर्यंत संख्या माहीत असत्या तर चार किंवा पाच सप्रत्यय वचने निर्माण झाली असती यात संशय नाही. परंतु रानटी आर्यांना तीनच आंख मोजता येत असल्यामुळे त्यांच्यात तीनच वचने निर्माण झाली. तीन पर्यंतच संख्या मोजण्या इतकी ज्यांची मजल गेली असे रानटी समाज अद्यापही काही आहेत. त्याच दर्जाचे हे रानटी आर्य होते. कालांतराने या त्रैवचनिक आर्यांना तिहींच्यापुढे अंक मोजता येऊ लागले व संख्या असंख्य आहेत हे ज्ञान झाले. हे ज्ञान होईतोपर्यंत भाषेत तीन वचनांचा पगडा इतका बेमालूम बसून गेला होता की, तीन संख्यावाचक जे रानटी दशेतील त्रिवचन त्यानेच असंख्य किंवा बहुसंख्या दाखवावयाचा प्रघात सोयिस्करपणामुळे रूढ झाला. त्रिवचन हे बहुवचनाचे काम करू लागले. एकाएकी पूर्वीचे कोणतेच काही मोडता येणे शक्य नसते. सबब, द्विवचनाचे लटांबर गळ्यात जसेच्या तसेच राहू देऊन मार्ग क्रमण करावा लागला. द्विवचन रहाण्याचे दुसरे कारण असे की, रानटी आर्य दोन या संख्येला बहु समजत नसत. एक या संख्येच्या जवळजवळचाच द्वि, अशी त्यांची समजूत असे. पुढे कालांतराने संख्येचे एक व अनेक असे द्विभाग आर्यांना जेव्हा समजू लागले, तेव्हा दोन ही संख्या अनेकांच्या भागात पडते हे त्यांच्या लक्षात आले व द्विवचन निरर्थक आहे हेही त्यांनी ओळखिले आणि त्याप्रमाणे प्राकृतभाषात या निरर्थक ओझ्याला वगळण्यात ही आले, तत्रापि रानटी आर्य जिचे पुरातन उत्पादक त्या संस्कृत व वैदिक भाषांतून हे लटांबर काढून टाकता आले नाही. कारण, ते भाषासंप्रदायात इतके मिसळून गेले होते की, त्याच्यावर शस्त्रप्रयोग केला असता, संस्कृत भाषेला मृत्यूच आला असता. याच कारणास्तव पाणिनीयात बहुषु बहुवचन असा प्रयोग आला आहे.

बहुवचन या शब्दाऐवजी अनेकवचन हा शब्द पाणिनीने योजला नाही. पूर्वाचार्यांची बहुवचन ही संज्ञा कायम ठेविली. बहुवचनाच्याऐवजी अनेकवचन असा शब्द पाणिनी योजिता, तर एकाहून अनेक जे द्विवचन त्याचा निर्वाह झाला नसता. रानटी आर्यांना संख्येचे तीन विभाग माहीत होते. एक, दोन व तीन. आपल्याला संख्येचे दोन भाग माहीत आहेत, एक व अनेक. दोनच भाग माहीत असल्यामुळे आपण एकवचन व अनेकवचन अशी दोनच वचने मानतो. त्याप्रमाणेच संख्येचे तीनच भाग करणारे रानटी आर्य एक संख्येकरिता एकवचन, दोन संख्येकरिता द्विवचन व तीन संख्येकरिता त्रिवचन, ज्याला पुढे बहुवचन म्हणू लागले, अशी वचने मानीत. तात्पर्य, रानटी आर्यांना तीनपर्यंतच संख्या माहीत असल्यामुळे, त्यांच्या भाषेत द्विवचन निर्माण झाले व ते रानटी आर्यांचे वंशज जे वैदिक ऋषि आणि पाणिन्यादि संस्कृत आचार्य त्यांना रूढीस्तव तसेच घेऊन मिरवावे लागले. द्विवचनाच्या उत्पत्तीचे हे असे कारण आहे. पहिल्या कलमात जे दोन प्रश्न विचारले होते त्यांपैकी एकाचे उत्तर या दुसऱ्या कलमात दिले. आता मराठीत दोनच वचने कशी आली ते सांगतो.

२ तीन या संख्येहून जास्त संख्या मोजता येऊ लागल्यावर आणि संख्येचे एक व अनेक असे विभाग केल्यावर, द्विवचनाची काहीएक जरूरी राहिली नव्हती. परंतु संस्कृत भाषेत द्विवचन नामे क्रियापदे, वगैरे जिकडे तिकडे पसरल्यामुळे, संस्कृत भाषा मोडल्याशिवाय हा रोग नाहीसा होणे शक्य नव्हते. रोगी मरावा तेव्हा नाहीशा होणाऱ्या रोगांपैकी हा रोग होता. रोगी मारून रोग मारण्याचे हे काम महाराष्ट्र्यादि भाषांनी केले ब्राह्मण संस्कृत बोलत, तेव्हा ते मेल्याशिवाय किंवा त्यांना सोडल्याशिवाय म्हणजे त्यांची भाषा सोडल्याशिवाय द्विवचनापासून सुटका होण्यासारखी नव्हती. शुद्ध ब्राह्मण, शुद्ध क्षत्रिय व शुद्ध वैश्य यांचा हेवा करणारे जे व्रात्य ब्राह्मण, व्रात्य क्षत्रिय व व्रात्य वैश्य यांनी अनार्य लोकांच्या सहाय्याने शुद्ध ब्राह्मणादीचा उपमर्द केला व त्यांची शुद्ध संस्कृत भाषा सोडून आपली अशुद्ध, अस्पष्ट व मिष्ट प्राकृत भाषा चालू करताना संस्कृतातील द्विवचन व अनेक लकार वगैरे निरुपयोगी लटांबराला फाटा दिला. नवे, राज्य, नवे लोक, नवे राष्ट्र, नवा धर्म व नवी भाषा जेव्हा निर्माण झाली तेव्हा संस्कृतातील द्विवचनाची ही अडगळ कायमची फेकून दिली गेली. अन्यथा परब्रह्माचे उच्छ्वसित जे वेद व ज्यातील एक स्वर ही चुकला असता ब्रह्महत्त्या केल्याचे पातक लागणार त्या गीर्वाणवाणीतील लाडके द्विवचन शुद्ध ब्राह्मणादि वर्णांच्या हातून उकिरड्यावर फेकले गेले नसते. तात्पर्य संस्कृतातील निरुपयोगी द्विवचन प्राकृत भाषांनी टाकून दिले. अर्थात् प्राकृताची कन्या जी मराठी तीत द्विवचन साहजिकपणेच आले नाही. फक्त एकवचन व अनेकवचन अशी दोन वचने राहिली.

३ वस्तुत: पहाता अनेकवचनाची देखील जरूर नाही. अनेकवचन काढून टाकिले, तत्रापि अर्थाचा बोध नामी होतो. मराठीत ही सुधारणा होऊन गेली आहे. एक पुरुष, दोन पुरुष, शंभर पुरुष या मराठी प्रयोगात अनेक संख्या दोन व शंभर या संख्यावाचक नामांनी दाखविली जात असून, पुरुष या शब्दाने दाखविली जात नाही, हा शब्द जसाचा तसाच रहातो. इथे अडगळ काढून टाकण्याच्या कामी मराठी महाराष्ट्राच्याही पुढे गेली. या कामी इंग्रजी मराठीच्या मागे आहे. two man, hundred man असे प्रयोग न करता two men hundred men असे प्रयोग इंग्रजी करते. ती जेव्हा two man, hundred man असे प्रयोग करण्याची सुधारणा करील तेव्हा मराठीची बरोबरी तिने केली असे होईल. मराठीतील अकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे अनेक वचनाचा प्रत्यय सर्वत्र झुगारून दिला, म्हणजे अनेकवचनाला रजा मिळाली. मग एकटे एकवचन तेवढे राहिले. परंतु त्याला एकवचन हेही नाव मग शोभणार नाही. कारण अनेकांच्या अपेक्षेने एकाची मातब्बरी भासत असते. तात्पर्य, एकवचनाची ही वस्तुत: जरूरी नाही. संख्यावाचक शब्दांनी दोन, वीस, शंभर वस्तू जशा दाखविल्या जातात तशीच एक या शब्दाने एक वस्तू दाखविली जाईल. त्याकरता वस्तुशब्दाला विकार करण्याचे कारण नाही. हे म्हणणे कित्येकांना काल्पनिक व विचित्र वाटेल. परंतु तसे वाटण्याचे कारण नाही. ही सुधारणा म्हणजे वचनाला बिलकुल रजा देण्याची सुधारणा कित्येक भाषात हजारो वर्षांपूर्वीच होऊन गेली आहे. उदाहरणार्थ Oh Rama ! You have Killed one thousand giants who habitially ate a hundred men, हे इंग्रजी वाक्य वचनांना अजिबात फाटा देऊन येणेप्रमाणे संस्कृत भाषेत बोलता येते :

हे नरशतभक्षकराक्षससहस्त्रमारकराम !

या संस्कृत संबोधक वाक्यात सात शब्द आहेत व त्यापैकी एकाही शब्दाला वचनार्थक किंवा विभक्त्यर्थक विकृती झालेली नाही. या रचनेला सामासिक रचना अथवा वृत्ती अशी संज्ञा आहे. समासात प्रत्ययाचा लोप करून व केवळ प्रातिपदिक अविकृत शब्द उच्चारून अर्थाचा बोध पूर्णपणे करता येतो. ही सामासिक वृत्ती अर्वाचीन संस्कृतात विपूल आहे. तिचा प्रकर्ष पहावयाचा असल्यास तो नैय्यायिकांच्या ग्रंथात हवा तितका बघून घ्यावा. न्यायग्रंथात सबंध पानचे पान एका समासाने व्यापिलेले वारंवार आढळते. तत्रापि शास्त्रीय गहन विषय ध्यानात येण्यास अडचण पडत नाही, कदाचित उलटे सौकर्य येतें. अपरिचितास हे सामासिक बोलणे कसेबसेच वाटेल हे खरे. परंतु हा केवळ

अनभ्यस्ततेचा परिणाम आहे. समासाने बोलण्याची सवय केली असता, तेच समस्त बोलणे व्यस्त बोलण्यापेक्षा सुलभ वाटते. सौलभ्य व सोय असल्यावाचून सामासिकभाषा प्रचारात आलीच नसती. याला साक्ष प्राकृत भाषांची. प्राकृत भाषा अविद्वान अशा सामान्य जनांची. परंतु प्रख्यात नाटककार जो भवभूती त्याने दोन-दोन, चार-चार ओळी लांब असे समास आपल्या मालतीमाधव नाटकात योजिलेले सर्व प्रसिद्ध आहेत. हे लंबेलंबे प्राकृत समास तत्कालीन प्राकृतजनांना, श्रोत्यांना व प्रेक्षकांना सहज ऐकता ऐकता समजततील अशी खात्री असल्यावाचून नाटककाराने ते केवळ स्वत:च्या हौसेकरिता घातले असतील हे संभवत नाही. सामासिक बोलणे उलगडवायला बिकट नसून उलट अत्यंत सोपे व शिवाय चमत्कृतिजनक असते. त्यात वचने नाहीत, विभक्त्या नाहीत, लकार नाहीत, कंटाळा येतील अशी वाक्यांवर वाक्ये नाहीत, ते समजावयाला सुबंताचा अभ्यास नको, तिङंताचा नको, काही नको, फक्त शब्दज्ञान असले म्हणजे झाले शब्दापुढे शब्द येऊन अर्थ आस्ते-आस्ते श्रोत्यांच्या मनात उतरत जातो. सर्वात ही सामासिक भाषा अत्यंत शास्त्रीय. पूर्वज रानटी स्थितीत असताना त्यांनी अज्ञानाने ज्या चुकीच्या पद्धती निर्माण केल्या त्या चुका टाळावयाला उत्तम मार्ग म्हटला म्हणजे ही सामासिक भाषा होय. लौकिकभाषेत जिकडे पहावे तिकडे प्रत्ययांचा बाजार. वचन घ्या प्रत्यय, लिंग घ्या प्रत्यय, विभक्ती घ्या प्रत्यय, आत्मने घ्या प्रत्यय, परस्मै घ्या प्रत्यय, भूत घ्या प्रत्यय, भविष्य घ्या प्रत्यय, प्रत्ययांखेरीज बोलणे नाही. प्रत्यय चुकला की अर्थ घसरला. या प्रत्ययांच्या रानातून वाट काढता काढता कोवळ्या बालकांचे तर किती हाल होतात ते विचारू नका. त्याऐवजी, प्रत्ययांना ज्यात अजिबात रजा मिळाली आहे ती अप्रत्यय सामासिकभाषा लहान मुलांना शिकण्याला सोयिस्कर नव्हे? हींत प्रत्ययच नसल्यामुळे, चुका पायात मोडण्याचा धाकच रहात नाही. ही सामासिक भाषा पद्धती प्रचारात येईल तो सुदिन ! एकदा संख्यावाचक सर्व शब्द भाषेत निर्माण झाल्यावर एकवचन, द्विवचन, त्रिवचन, बहुवचन व अनेकवचन, यांची म्हणजे वचनांची जरूरच रहात नाही. रानटी आर्यांना तीनच वचने माहीत होती. कित्येक रानटी लोकांच्या भाषात दहा-दहा, वीस-वीस वचने आढळतात. हा वचन बाहुल्याचा प्रकार वचनत्रयाच्या इतकाच रानटी स्थितीचा द्योतक आहे.

४ वचने मुळीच नसणे हे सर्वात उत्तम. याच सुधारणेकडे मराठी वगैरे भाषा आस्ते-आस्ते जात आहेत. तीन वचनांची दोन वचने झाली, दोहोंचे यापुढे हजारो वर्षांनी एकवचन होईल आणि नंतर वचनाला अजिबात फाटा मिळेल. तिहींची दोन वचने व्हावयाला तीन-चार हजार वर्षे लागलीं. यावरून मुळीच वचने काढून टाकावयाला किती हजार वर्षे लागतील त्याचा अंदाज करावा.

५ हा पोकळ व अनिश्चित अंदाज करीत बसणे जितके उपयोगाचे आहे त्यापेक्षा संस्कृतात जी तीन वचने आहेत त्यांच्या रचनेचा अभ्यास भाषाशास्त्राला जास्त उपकारक आहे. संस्कृतात सात विभक्त्या आहेत व या साती विभक्त्यांना तीन वचने आहेत. म्हणजे एकंदर २१ स्थाने प्रत्ययांची होतात. या प्रत्ययांचा अर्थ काय व ते शब्दांना कसे जुडत गेले याचा शोध करणे मनोरंजन आहे. वैदिक व पाणिनीय भाषा सप्रत्ययावस्थेत असलेल्या आपणाला माहीत आहेत. वैदिकभाषा ज्या अप्रत्यय भाषेपासून निघाली त्या भाषेचा मासला किंचित अवशिष्ट राहिलेला आहे. अप्रत्यय स्थितीत फक्त शबीद एकापुढे एक उच्चारून वाक्य बनत असे, अशी आपण या अवशिष्ट शब्दांच्या प्रमाणावरून कल्पना करतो इतकेच. तेव्हा शोधाचा प्रारंभ सप्रत्यय जी वैदिकभाषा तिजपासून करणे प्राप्त होते. वैदिक भाषेत शब्दांना सात विभक्त्यांत जे प्रत्यय लागतात त्यांची याद पाणिनीने दिली आहे आणि त्याखेरीज सुपां, सुलुक् इत्यादी सूत्रात व आज्जसेरसुक या सूत्रात आणिक विभक्तिप्रत्यय सांगितले आहेत. स्वौजस इत्यादी सूत्रांतील प्रत्ययांना सुपां सुलुक् इत्यादी सूत्रांतील प्रत्यय बहुलत्वाने येणारे अपवाद म्हणून सांगितले आहेत. याचा अर्थ इतकाच की हे अपवादक प्रत्यय वैदिकभाषेत पूर्ववैदिकभाषेतील अवशिष्ट म्हणून राहिलेले प्रत्यय होत. उदाहरणार्थ, वैदिकभाषेत देव या शब्दाचे देवौ असे द्विवचन होत असे. परंतु या देवीरूपाप्रमाणेच किंवा त्याहून ही जास्त प्रमाणात देवा असे द्विवचनाचे अपवादक रूप आढळते. मराठीत देवाने हे तृतीयेचे रूप सरसहा आहे. परंतु ज्ञानेश्वरीत वर इतर जुन्या कवितेत देवे असे अपवादक रूप सडकून येते. हे देवे रूप देवाने या रूपाहून जुनाट आहे. त्याप्रमाणेच वैदिक देवा हे द्विवचनाचे रूप वैदिक देवौ या रूपाहून जुनाट आहे. पूर्ववैदिक व वैदिकभाषेत अकारात पुल्लिंगी देव शब्द असा चाले :

| | एक | द्वि | बहु |
|---|---|---|---|
| १ | देवस् | देवौ, देवा | देवासस्, देवा:, देवे, देवाँ: |
| २ | देवम् | देवौ, देवा | देवान् |
| ३ | (देवया) देवेन | देवाभ्याम् | देवेभिस्, देवै: |
| ४ | देवाय | देवाभ्याम् | देवेभ्यस्, देवे |
| ५ | देवात् | देवाभ्याम् | देवेभ्यस्, देवे |
| ६ | देवस्य | देवयोस् | देवानाम् |
| ७ | (देवा) देवे | देवयोस् | देवेषु |

या रूपातील प्रत्ययाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू. वैदिक भाषेहून दुसऱ्या कोणत्याही सगोत्र जुनाट भाषेचे आपल्याला तपशीलवार ज्ञान नाही. अपवादक प्रत्ययावरून एवढे मात्र अनुमान होते की, वैदिकभाषेहून जुनाट अशी एक जुनाट वैदिकभाषा होती. त्या जुनाट वैदिकभाषेत ज्याअर्थी द्विवचनी आ, अनेकवचनीं असस्, तृतीयेचा अयाच्, सप्तमीचा आल् इत्यादी प्रत्यय आहेत त्याअर्थी हे प्रत्यय ऊर्फ शब्दसंक्षेप जुनाट वैदिकभाषेहूनही अति जुनाट अशा पूर्ववैदिक भाषेतून आले असले पाहिजेत. म्हणजे (१) वैदिकभाषा, (२) जुनाट वैदिकभाषा व (३) अत्यंत जुनाट पूर्ववैदिकभाषा, अशा तीन भाषा एका पूर्वी एक होऊन गेल्या असाव्या असे अनुमान होते. पैकी वैदिकभाषा व जुनाट वैदिकभाषा या दोन्ही एकाच भाषेची नवी व जुनी रूपे आहेत, जीपासून जुनाट वैदिकभाषेत व वैदिकभाषेत प्रस्तुत प्रत्यय आले ती अत्यंत जुनाट वैदिकभाषा स्वतंत्र निराळी भाषा होती यात मात्र संशय नाही. ही निश्चित अनुमाने गृहीत धरून प्रत्ययांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. बोलणे वचनासंबंधाचे आहे. सबब, मी असे अनुमान करतो की प्रथमेचे स्, आ, किंवा औ व अस् किंवा असस्, हे प्रत्यय एक, दोन व तीन या संख्यांचे वाचक अनुक्रमाने आहेत. स् चा उच्चार पाणिनीय भाषेत किंवा सध्या मराठीत जो होतो त्याहून निराळा उच्चार अत्यंत जुनाट वैदिकभाषेत होत असे जवळजवळ ऱ्ह् च्यासारखा स् चा उच्चार असे किंवा जवळजवळ विसर्गासारखा स् चा उच्चार असे; म्हणजे कंठ्य असे. वैदिकभाषेत, अर्थात् पाणिनीय भाषेत स् चा हा कंठ्य उच्चार जाऊन दन्त्य झाला; तत्रापि त्याच्या कंठ्यात्वाची आठवण बुजाली नव्हती. पदांती दन्त्य स् चा कंठ्य विसर्ग होतो. असा जो नियम पाणिनी सांगतो त्याचे कारण स् चे मूळचे कंठ्यत्व होय. रामस् पठति= रामः पठति हा जो बदल होतो तो का होतो, तर स् हा मूळचा कंठ्य आहे. म्हणजे स् चा कंठ्य उच्चार वैदिकभाषेत इतरत्र यद्यपि लुप्त होऊन दंत्य झाला होता, तत्रापि पदांती तो कंठ्य उच्चार जसा चा तसा च कायम राहिला. याचा अर्थ एवढाच की, रामस् याचा उच्चार रामः असा वैदिक किंवा पाणिनीय काळी होत असे. दन्त्य स् चा कंठ्य विसर्ग का होतो, हे पाणिनीला माहीत नव्हते. मात्र होतो, हे तो नित्याच्या बोलण्यात पहात होता. सबब, तो चमत्कार त्याने नमूद करून ठेविला. येणेप्रमाणे रामस्= रामः हे रूप सिद्ध झाले. रामस् किंवा रामः याचा अर्थ एक राम.

६ अति जुनाट वैदिकभाषेत स् चा उच्चार ऱ्ह् सारखा कंठ्य होत असे म्हणून वर सांगितले. या अति जुनाट ऱ्ह चा पाणिनीयकाली व वैदिककालीं र झाला. परंतु हा ऱ्ह् अत्यंत लुप्त झाला नाही. पदांती पाणिनीयकाली हा ऐकू येत असे. पाणिनीने ससजुषी रुः या सूत्रात पदांतीच्या स् चा र होतो म्हणून सांगितले आहे. स् चा र होणे हा आपल्याला चमत्कार वाटतो. परंतु पाणिनीच्या या र् चा उच्चार ऱ्ह् होता हे लक्षात घेतले म्हणजे हा

चमत्कारिकपणा वाटत नाहीसा होतो. ऱ्ह् तील ह् वर जास्त जोर दिला म्हणजे ऱ्ह् ह च्या किंवा उपसर्जनी याच्यासारखा भासतो, आणि र् वर जास्त जोर दिला म्हणजे ऱ्ह् रच्यासारखा भासतो. स् चा उपसर्जनीय होतो व स् चा र् होतो. हे जे दोन नियम पाणिनीने दिले त्याचे कारण ऱ्ह् चे हे दोन उच्चार होत. येणेप्रमाणे रामस्पासून दोन रूपे होत, राम: किंवा रामह् आणि रामऱ्ह् किंवा रामर.

७ ऱ्ह् व उपसर्जनीय हे कंठ्य आहेत व त्यांचे अ शीं सावर्ण्य आहे. ह् वर जास्त जोर दिला म्हणजे ऱ्ह् ही कंठ्य होतो व त्याचे अ शी सावर्ण्य निपजते. सबब पुनर् + रवि: याचा संधि र् चा अ होऊन, पुन अ रवि:= पुना रवि: असा होतो. र् च्या पुढे र् आला असता पाठीमागील स्वराला दीर्घत्व येते म्हणून पाणिनी सांगतो. परंतु ते का येते हे तो सांगत नाही. खरे कारण ऱ्ह् चा पूर्वसवर्णीभवन पावण्याचा स्वभाव होय. पुनऱ्ह् रवि:= पुन अ रवि: । हरि: रमते= हरिऱ्ह् रमते= हरिहि रमते= हरि इ रमते= हरी रमते. । गुरु:= गुरुहु=गुरुउ=गुरू रमते. । इ.इ.इ. ऱ्ह् चा हा स्वभाव प्रथमेचे द्विवचन साधताना उत्तम दृष्टीस पडतो. स् हा प्रत्यय एक ही संख्या दाखवितो. दोन ही संख्या जुनाट रानटी आर्य दोनदा एक ही संख्या उच्चारून प्रदर्शित करीत. स=ऱ्ह्=: हा प्रत्यय एक देव दर्शविण्यास एकदा लावीत आणि दोन देव दर्शविण्यास दोनदा लावीत तेव्हा, देव+स्+स् अशी द्विवचनार्थक स्थिती आली. स चा ऱ्ह् होऊन देव+ऱ्ह्+ऱ्ह् अशी स्थिती आली. पुढे ऱ्ह् ऊर्फ र् असल्यामुळे पहिल्या ऱ्ह ला पाठीमागील अ मुळे पूर्व सवर्णत्व येऊन देव+अ+ह् अशी स्थिती झाली. अनेक रानटीभाषात ह् चा व् आणि व् चा उ होत असतो. तोच स्वभाव रानटी आर्यांच्या ही भाषेचा होता. सबब दुसऱ्या ऱ्ह् चा उ होऊन देव+अ+उ अशी स्थिती झाली. र् चा उ होतो हे अतो रो: या सूत्राकत पाणिनी सांगतो. परंतु र् चा उ का होतो हे तो सांगत नाही. स् चा उच्चार जनाट रानटी आर्यांच्या भाषेत ऱ्ह् होता व ऱ्ह्=ह् चा व्=उ असा बदल ते करीत हे पाणिनीला माहीत नव्हते. पण स् चा र् होतो व र् चा उ होतो हे तो विचक्षण वैय्याकरण पहात होता आणि जे त्याने भाषेत प्रत्यक्ष पाहिले ते त्याने काळजीपूर्वक नमूद करून ठेविले. हा त्याचा आस्थेवाईकपणा सध्या आपल्या फार उपयोगी पडतो. कारण तो जी स्थिती नमूद करतो व जे बदल दाखल करतो त्यावरून भाषेचा पूर्वीचा इतिहास कळण्यास मार्ग होतो. येणेप्रमाणे देव+अ+उ अशी स्थिती प्राप्त हो उन द्विवचनाचे देवौ हे रूप पाणिनीकाली व वैदिककाली साधे. देवौ म्हणजे दोन देव. देवौ रूप होताना पहिल्या ऱ्ह् चा अ होई व दुसऱ्या ऱ्ह् चा उ होई. दुसऱ्या ऱ्ह् चा ही कित्येक रानटी आर्य पूर्वसवर्णच करीत, म्हणजे देव + अ + अ अशी स्थिती येऊन देवा असे द्विवचनाचे दुसरे रूप बने.

८ आता त्रिवचनाचें (कारण रानटी आर्यांना तीनपर्यंतच आंख मोजता येत होते) ऊर्फ ज्याला पुढे पाणिनी बहुवचन म्हणू लागला व आपण अनेकवचन म्हणतो त्याचे पृथक्करण करू. रानटी आर्य तीन देव दाखवावयाला एकसंख्यावाचक स्=ऱ्ह् हा प्रत्यय देव शब्दास तीनदा लावीत. म्हणजे देव+स्+स्+स् अशी स्थिती प्राप्त होई. पहिल्या स् चा ऱ्ह् होऊन पूर्वसवर्ण अ होई आणि तिसऱ्या स् चा ऱ्ह् होऊन उपसर्जनीय बने. म्हणजे देव + अ + स् + : अशी स्थिती होऊन देवास: हे त्रिवचनाचे रूप निर्माण होई किंवा पहिल्या स् चा ऱ्ह व अ होऊन दुसऱ्या दोन्ही सं् चा ऱ्ह् व उपसर्जनीय होई आणि देव+अ+:+ : अशी स्थिती बनून देवा: हे त्रिवचनाचे दुसरे रूप साधे. देव: या रूपात एक स् आहे, देवौ यात दोन स् आहेत व देवा: यात तीन स् आहेत. या स् प्रत्ययाचा अर्थ एक म्हणून आपण अनुमान बसविले. या अनुमानाला एक प्रत्यक्ष पुरावाही आहे. संस्कृत् व सपदि अशी दोन अव्यये अगदी जुनाटांतल्यापैकी आहेत. पहिल्याचा अर्थ एकवेळ व दुसऱ्याचा अर्थ एकदम असा आहे. येथे दोन्ही शब्दात स चा अर्थ एक असा आहे हे निश्चित. अनेकवचनाचे तिसरे रूप देवे. हे रूप देवास: व देवा: या रूपाहून जुने. अस्मे, युष्मे, सर्वे, वगैरे सर्वनामात हे एकारात रूप वैदिकभाषेत येते. हे एकारात रूप पैशाच्या भाषेत आढळते, जसे पुलिशे. याची साधनिका वरच्या दोन्ही रूपाच्याहून निराळी आहे. देवासस् या रूपात स्=ह्= अ असे आदेश होतात. देवे या रूपात स्=ह्=अ=य=इ असे आदेश होऊन देव+स्+स्+स्=देव+अ+इ+इ अशी स्थिती बने व देवे हे रूप निष्पन्न होई. अनेकवचनाचे चवथे रूप देवाँ: याची साधनिका अशी: ह्न कोणता ही अवसानीचा अप्रगृह्य स्वर विकल्पे अनुनासिक असे. त्यामुळे देवाह् या रूपातील अन्त्य आ अनुनासिक उच्चारीत, म्हणजे देवाँह् असा उच्चार होई. या अनुनासिकाचा उच्चार न् होऊन देवान्ह् असे रूप होई. अन्त्य ह् चा लोप होऊन देवान् हे रूप बने.

९ आता द्वितीया साधनिकेकरिता घेऊ. द्वितीयेपासून सप्तमीपर्यंतच्या विभक्त्यांची रूपे साधताना प्रथमारंभी असा इशारा देणे इष्ट आहे की, प्रथमेच्या तिन्ही वचनांची रूपे इतर विभक्त्यांच्या रूपांना आधार आहेत. म्हणजे प्रथमेच्या रूपांना कर्म, करण, संप्रदान, अपादान, इत्याद्यर्थक प्रत्यय लागून बाकीच्या विभक्त्यांची रूपे सिद्ध होतात. देव याचे प्रथमैकवचन देवस् याला म् प्रत्यय लागून देवस्+म्= देवह् + म् अशी स्थिती होई व ह् चा पूर्वसवर्णांत लोप होऊन ऐवम् असे द्वितीयैकवचनाचे रूप साधे. त्याचप्रमाणे देवौ+म् =देवौम् अशी स्थिती होऊन अन्त्य म् चा लोप होई व देवौ हे द्वितीया द्विवचनाचे रूप साधे. प्रथमेच्या अनेकवचनाचे देवाँ: म्हणून जे चवथे रूप सांगितले ते आधाराला घेऊन देवाँ: + म् अशी स्थिती होई व अनुनासिकाचा न् होऊन आणि अन्त्य म् चा लोप होऊन देवान् हे वैदिक रूप बने. म् प्रत्ययाचा अर्थ निर्जीव वस्तू, सजीव किंवा सामर्थ्यवान्

वस्तूने असमर्थ किंवा निर्जीव वस्तूवर व्यापार चालविलेली वस्तू.

१० द्वितीयेपुढील ज्या विभक्त्या त्यांची ही रूपे प्रथमेच्या रूपाना प्रत्यय जोडून होत. प्रथमेच्या रूपांनी एक, दोन व तीन या संख्यांचा बोध होई व बाकीच्या विभक्त्यांच्या प्रत्ययांनी कर्म, करण, संप्रदान इत्यादी अर्थ दाखविले जात, त्यांना वचनांचे संख्यादर्शक प्रत्यय निराळे लावण्याची जरूर नसे. तात्पर्य, वचनांचे प्रत्यय निराळे व विभक्त्यांचे प्रत्यय निराळे. वचनांचे प्रत्यय एकदा प्रथमा विभक्ती साधताना लावीत व त्या विभक्तीच्या रूपांवर इतर विभक्त्यांच्या प्रत्ययांची कलमे करीत. तृतीया, चतुर्थी व पंचमी यांच्या एकवचनी आणि षष्ठी व सप्तमी यांच्या तिन्ही वचनी स्य या जुनाट शब्दाची स्येन, स्या, स्ये, स्यै, स्यस्, स्यास्, स्यत्, स्य, स्योस्, स्याम्, स्यु, स्यि, स्यौ इत्यादी रूपे लागत आणि तृतीया, चतुर्थी व पंचमी यांच्या द्विवचनी व त्रिवचनी भ्याम्, भ्यस्, भिस् इत्यादी भादि प्रत्यय लागत, तृतीयादि विभक्त्यांची साधनिका अशी :

(१) देवस्+स्येन= देवह् ह्येन = देवह्येन=देव येन=देव एन = देवैन (पूर्वसवर्ण)

✻स्य चा ह्य व ह्य चा य होतो, तृतीयैकवचनाचा जो टा प्रत्यय तत्स्थानी इन आदेश होतो, असे पाणिनी सांगतो. हा इन (वस्तुत: एन) कोठून कसा आला ते त्याला माहीत नाही.

(२) देवा + भ्याम् = देवाभ्याम्

✻ तृतीया, चतुर्थी व पंचमी यांच्या द्विवचनाचे रूप साधताना प्रथमेचे द्विवचन द्वौ हे आधाराला न घेता, जुने देवा हे रूप आधाराला घेऊन त्याला भ्याम् प्रत्यय जोडीत. भ्याम् प्रत्ययाच्या आधी अंगस्य दीर्घ: स्यात् असे पाणिनी सांगतो. देवा या जुनाट रूपाला भ्याम् प्रत्यय लागतो हे त्याला माहीत नाही.

(३) देवे + भिस् = देवेभि: = देवेहि: = देवेइ: = देवै:

✻ भ चा ह् होतो. भिस् प्रत्ययाच्या स्थानी ऐस् आदेश होतो म्हणून पाणिनी सांगतो. भि चा ऐ का व कसा होतो हे त्याला माहीत नाही. ए + इ चा संधी ऐ असा जुनाट भाषेत होत असे.

(४) देवस् + स्य = देवह् + ह्य =(ह् + चा अ होऊन व ह्य चा य होऊन ) देवा +य = देवाय.

✻ ए प्रत्ययाच्या स्थानी या आदेश होतो व अंगाला दीर्घत्व येते असे पाणिनी

सांगतो. य प्रत्यय कसा आला व अंगाला दीर्घत्व का येते हे पाणिनीला माहीत नाही.

(५) देवाभ्याम् तृतीया द्विवचनाप्रमाणे.

(६) देवे + भ्यस् = देवेभ्य:

✻ देवे या जुनाट रूपापुढे भ्यस् प्रत्यय लागला आहे. बहुवचने झाल्येत् म्हणजे भ्यस् प्रत्यय पुढे असता अंगाचा एकार होतो, असे पाणिनी सांगतो. एकार का येतो ते पाणिनीला माहीत नाही.

(७) देवस् + स्यत् = देवह् + स्यत् = देवा ह्यत् = देवायर = देवाअत् = देवात्

(८) तृतीया द्विवचनाप्रमाणे.

(९) चतुर्थी अनेकवचनाप्रमाणे.

(१०) देवस् + स्य = देवह् + स्य = (ह् चा पूर्वसवर्ण होऊन) देवस्य.

(११) देवअ + स्योस् = देवअ + योस् = देवअ + योस् = देवअ + ओस् =देवय् + ओस् = देवयो:

✻ ओस् प्रत्ययामागे अंगाला एकार होतो म्हणून पाणिनी सांगतो. वस्तुत: द्विवचन देवअअ असे आहे. देवअअ चे देवअ. अ चा य होऊन देवय्.

(१२) देवान् + स्याम् =देवान् + याम् = देवान् + याम् = देवान् + आम् = देवानाम्.

✻ आम् प्रत्ययाला नुमागम होतो म्हणून पाणिनी सांगतो.

(१३) देवस् + स्यि =देवह् + ह्यि = देवह् + यि = देव + इ = देवे.

✻ पाणिनी इ प्रत्यय देतो.

(१४) षष्ठी द्विवचनाप्रमाणे.

(१५) देवे+स्यु=देवेष्यु=देवेषु.

✻ अंगाला एकार होतो म्हणून पाणिनी लिहितो.

(१६) देव + स् = देवह् = देवअ ३

✻ संबोधन म्हणजे दूराद् आव्हान. ते असताना अंत्य स्वर प्लुत होतो. ह् चा सवर्ण अ होऊन देवअअअ असे रूप झाले, स् चा लोप होतो म्हणून पाणिनी सांगतो. तसा प्रकार नसून, तीन स् चे तीन अ होऊन संबोधनी त्रिमात्राक प्लुत अ होतो.

९ वरील पृथक्करणाचा आता समाजदृष्टया अर्थ करू. अर्थ करण्याला सुलभ जावे म्हणून देव या शब्दांची जुनाट आर्यभाषेत, वैदिकभाषेत व पाणिनीय भाषेत आठही विभक्त्यांत एकंदर जी रूपे सांपडली ती सर्व एके ठिकाणी नमूद करतो.

| | एक | द्वि. | त्रि. |
|---|---|---|---|
| १ | देव: | देवौ, देवा | देवा:, देवास:, देवे, देवाँ: |
| २ | देवम् | देवौ, देवा | देवान् |
| ३ | देवेन् (देवया) | देवाभ्याम् | देवेभि:, देवै: |
| ४ | देवाय | देवाभ्याम् | देवेभ्य:, देवे |
| ५ | देवात् | ,, | ,, देवे |
| ६ | देवस्य | देवयो: | देवानाम् |
| ७ | देवे देवा | ,, | देवेषु |
| ८ | देव ३ | देवौ ३ | देवा: ३ इ.इ.इ. |

एकवचनात आठही विभक्त्यांत देव हे एकच रूप आहे. द्विवचनात देवौ व देवा अशी दोन रूपे आहेत. म्हणजे वैदिककाली ही दोन्ही रूपे बोलण्यात येत व दोन्ही रूपे शिष्ट समजली जात. त्यातल्या त्यात देवा हे रूप जुनाट समजत. अर्थ नीट उलगडण्याकरिता मराठीतील एक-दोन उदाहरणे घेऊ. शिष्ट मराठीत माणसे असे रूप येते. परंतु कोंकणातील बालूच्या मराठीत माणसाँ असे रूप येते, याचा अर्थ असा की, ही दोन रूपे योजणारे समाज शिष्ट व अशिष्ट असे दोन आहेत. समजा की, शिष्ट मराठीत माणसे व माणसा ही दोन्ही रूपे प्रचलित आहेत. तर त्यापासून असा बोध होईल की, ही दोन भिन्न रूपे योजणारे दोन समाज एकवटून गेले असून दोन्ही समाज पायरीवर आहेत व दोघांना शिष्ट ही संज्ञा आहे. हाच प्रकार वैदिककाली झाला. देवौ बोलणारा एक समाज होता व देवा बोलणारा दुसरा आर्य समाज होता. दोघे तुल्यबल

असून दोघांचा मिलाफ झाला व भाषेत दोन शिष्ट रूपे शिरली. मराठीतील दुसरे एक प्रत्यन्तर घेऊ. ज्ञानेश्वरीभाषेत सुंदरे गोपुरे असा प्रयोग येतो व वर्तमान मराठीत सुंदर गोपुरे असा प्रयोग होतो. कोण्या वर्तमान कवीने छंद: सुखार्थ किंवा हौसेखातर एकाच काव्यात सुंदर व सुंदरे असे अनेकवचनी दोन्ही प्रयोग केले तर त्यापासून अर्थ असा निष्पन्न होईल की, दोन्ही प्रयोग शिष्ट असून एक दुसऱ्याहून जुनाट आहे. सामाजिकदृष्ट्या अर्थ असा होईल की, कालाचे बहुत अंतर असणारे असे दोन समाज होते व एक दुसऱ्याचा वंशज होता. हाच दाखला वैदिककालीन समाजालाही लावता येईल. देवा रूप योजणारा समाज देवौ रूप योजणाऱ्या समाजाहून कालाने अंतरित असून जुनाट होता, तत्रापि वंशाने एक होता. प्रथमा त्रिवचनाची चार रूपे आहेत. पैकी देवास: याचा संक्षेप देवा: असल्यामुळे वस्तुत: भिन्न अशी तीनच रूपे आहेत. पैकी देवाँ: हे रूप देवा: या रूपाचा अनुनासिक पर्याय आहे. जुनाट रानटी आर्यात देवाँ: व देवे असे भिन्न प्रयोग करणारे दोन समाज असून, शिवाय देवास: हे रूप योजणारा तिसराही एक समाज होता आणि या तीन जुनाट समाजांचा मिलाफ होऊन वैदिक समाज बनला. द्विवचनाची दोन भिन्न रूपे योजणारे दोन भिन्न समाज होते म्हणून सांगितले, देवौवाल्यांचा एक समाज व देवावाल्यांचा दुसरा समाज, हे दोन समाज देव शब्द द्विवचनी दोन भिन्न तऱ्हांनी असा चालवीत :

| | १ | २ |
|---|---|---|
| १ | देवौ | देवा |
| २ | देवौ | देवा |
| ३ | देवौभ्यां | देवाभ्याम् |

दोन्ही समाजाचा मिलाफ झाल्यावर दोन्ही समाजाच्या भाषांचाही मिलाफ झाला व दोन्ही भाषांतील उच्चाराला सुकर अशी रूपे संमिश्र समाजात शिल्लक राहून प्रचलित झाली. प्रथमा व द्वितीया यांच्या द्विवचनी देवौ हे रूप संमिश्र समाजाला उच्चारसुलभ वाटले आणि तृतीया, चतुर्थी व पंचमी यांच्या द्विवचनी देवाभ्याम् हे रूप सुलभ वाटले. हाच प्रकार अनेकवचनाच्या संबंधाने झाला. उपयुक्त तीन समाज देव शब्द अनेकवचनी तीन तऱ्हांनी चालवीत :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | देवा: | देवे | देवाँ: |
| २ | देवा:म् | देवेम् | देवान् |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | देवा:भि: | देवेभि: | देवान्भि: |
| ४ | देवा:भ्य: | देवेभ्य: | देवान्भ्य: |
| ५ | देवा:म् | देवेयाम् | देवानाम् |
| ६ | देवा:सु | देवेषु | देवान्सु |

तिघांचा मिलाफ झाल्यावर संमिश्र समाजाने उच्चाराला सुकर अशी रूपे तेवढी ठेविली आणि बाकीच्यांना रजा दिली. संमिश्र समाजाने म्हणजे वैदिकसमाजाने प्रथमेचे देवा: हे रूप ठेविले, द्वितीयेचे देवान् हे रूप ठेविले, तृतीयेचे देवेभि: हे रूप ठेवून शिवाय त्याहून सुलभ असे देवै: हे नवे रूप घडविले, चतुर्थीचे देवेभ्य: रूप पसंत केले आणि षष्ठी व सप्तमी यांची देवानाम् व देवेषु ही रूपे घेतली. ही रूपे पसंत करण्यात उच्चारसौलभ्याकडे जशी दृष्टी होती तशीच अनेक विभक्त्यांत एकाच उच्चाराची जी रूपे होती त्यांनाही बगळण्यात आले. भ्याम्च्या पाठीमागे देवा हे रूप का आणि भ्यस्च्या पाठीमागे देवे हे रूप की, देवान् या द्वितीयेच्या व देवानाम् या षष्ठीच्या रूपात न अकस्मात् काय म्हणून घुसला इत्यादी शंकांचे निवारण वरील पृथक्करणाने व अर्थनिवेशनाने होते. नाही तर पाणिनीच्याप्रमाणे कोरडी कारणे देऊन समाधान मानावे लागते. भ्याम्च्या पाठीमागे अंगाला दीर्घत्व येते,  भ्यस्च्या मागे अंगाचा एकार होतो, षष्ठीच्या अनेकवचनी नुमागम होतो आणि द्वितीया अनेकवचनी अस् प्रत्ययाच्याऐवजी आन् प्रत्यय येतो, अशीकाही तरी समजूत करून घ्यावी लागते. पाणिनीची परिभाषा एकीकडे सारिली म्हणजे, कित्येक प्रत्ययामागे देव शब्दाचे देवा असे रूप होते व कित्येक प्रत्ययामागे देव शब्दाचे देवा असे रूप होते व कित्येक प्रत्ययांमागे देव असेच रूप रहाते एवढेच पाणिनी सांगतो हे उघड दिसते. एका देव शब्दाची देवा: देवान्, देवानाम्, देवेभ्य: अशी आकारी नकारी व एकारी रूपे होतात एवढेच पाणिनी सांगतो. परंतु या कोरड्या सांगण्याने समाधान होत नाही. ही भिन्न रूपे योजिणारे भिन्न समाज होते, देव हा एकच शब्द ते निरनिराळ्या तऱ्हांनी चालवीत व या भिन्न समाजांचा मिलाफ होऊन प्रत्येक भाषेतील उच्चारसुलभ रूपे संमिश्र वैदिकभाषेत राहिली इत्यादी परंपरा कळली म्हणजे जे समाधान होते ते असे आहे एवढ्या कोरड्या सांगण्याने होत नाही.

१० भिन्न भाषा बोलणाऱ्या भिन्न समाजांचे संमिश्रण होऊन वैदिकसमाज निर्माण झाला या बाबीच्या सिद्ध्यर्थ वैदिकभाषेतील आणिक काही शब्दांचे परोक्षण करू, तस्थिवस् हा शब्द, याची रूपे येणेप्रमाणे :

| | | १ | २ | ३ | |
|---|---|---|---|---|---|
| सर्वनामस्थान | १ | तस्थिवान् | तस्थिवांन्सौ | तस्थिवांस: | |
| सर्वनामस्थान | २ | तस्थिवांसम् | ,, | तस्थुष: | |
| | ३ | तस्थुषा | तस्थिवद्भ्याम् | तस्थिवद्भि: | |
| | ४ | तस्थुषे | ,, | तस्थिवद्भ्य: | |
| | ५ | तस्थुष: | ,, | ,, | |
| भसंज्ञा | ६ | ,, | तस्थुषो: | तस्थुषाम् | |
| भसंज्ञा | ७ | तस्थुषि | ,, | तस्थिवत्सु | पदसंज्ञा |
| | ८ | तस्थिवन् | | | |

या रूपावलीत रूपांचे तीन भेद आहेत. १ कित्येक रूपे तस्थिवान्स् या अंगावरून साधलेली आहेत; २ कित्येक तस्थुष् या अंगावरून निघाली आहेत व कित्येक तस्थिवत् या अंगावरून बनली आहेत. हा असा त्रिविध प्रकार का? पाणिनी सांगतो की, हे असे होते. कोठे होते तेही तो सांगतो. या तीन प्रकारांचे पद, भ व सर्वनामस्थानविशिष्ट, असे त्याने तीन वर्गही केले आहेत. परंतु, एकाच मूळ शब्दाच्या २१ रूपांच्या या अशा तीन तऱ्हा का याचा खुलासा त्याने केला नाही. वैदिकसमाजापूर्वी अशी स्थिती होती की, उष्, इवान्स् व इवत् असे तीन निरनिराळे प्रत्यय लिटाला लावून तीन निरनिराळी कृदन्ते बनविणारे तीन निरनिराळे समाज होते. तस्थिवान्स्वाले आपले कृदन्त येणेप्रमाणे चालवीत :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | तस्थिवान् | तस्थिवान्सौ | तस्थिवान्स: |
| २ | तस्थिवांसम् | तस्थिवांसौ | तस्थिवान्स: |
| ३ | तस्थिवांसा | तस्थिवांभ्याम् | तस्थिवांभि: |
| ७ | तस्थिवांसि | तस्थिवांसो: | तस्थिवांसु |

तस्थुष् वाले आपले कृदन्त असे चालवीत:

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | तस्थुष् | तस्थुषौ<br>तस्थुष् | तस्थुषः, तस्थुष् |
| २ | तस्थुषम् | ,, | ,, |
| ३ | तस्थुषः | तस्थुडम्भ्या | तस्थुडिःभ |
| ७ | तस्थुषि | तस्थुषोः | तस्थुटस |

तस्थिवत् वाल्यांचे कृदन्त असे चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | तस्थिवत् | तस्थिवतौ<br>तस्थिवत् | तस्थिवतः, तस्थिवत् |
| २ | तस्थिवतम् | ,, | ,, |
| ३ | तस्थिवता | तस्थिवद्भ्याम् | तस्थिवद्भिः |
| ७ | तस्थिवतः | तस्थिवतोः | तस्थिवत्सु |

लिट्पासून झालेल्या कृदन्ताचे पूर्ववैदिक तीन समाजात असे तीन प्रकार असत. हे तीन समाज एकवटल्यावर संमिश्र वैदिकसमाजाने तिन्ही प्रकारातून उच्चाराला सुलभ अशी रूपे निवडून पाणिनीने दिलेली रूपे योजण्याचा प्रघात पाडला. सभा भरवून व कायदा करून प्रघात पाडला असे नव्हे. संमिश्र समाजाच्या बोलण्याच्या घसटीमध्ये ती ती रूपे त्या त्या प्रत्ययामागे लावण्याचा, संमिश्र समाजाच्या स्वभावानुसार व लकबीनुसार सहज ओघाओघाने प्रघात पडला इतकेच. वैय्याकरण व शाब्दिक जेव्हा शब्दविचार व रूपविचार करू लागले तेव्हा एकाच शब्दाच्या २१ रूपात तीन भेद दिसतात असे त्यांच्या लक्षात आले. त्याकाळी त्या भेदांचे कारण पहाण्याकडे कल नव्हता. वर्तमानकाळी कारण शोधण्याकडे लक्ष असल्यामुळे, आपण या भेदांचे कारण देण्याचा यत्न करतो. या तीन समाजांच्या भाषेतील रूपांची वाटणी एकविसांपैकी कोणकोणत्या स्थळी झाली ते पहाण्यासारखे आहे. तस्थिवान्स्वाल्यांना सर्वनामस्थानची पाकच रूपे आली. तस्थुष्वाल्यांच्या वाटणीस सबंद भ म्हणजे स्वराने किंवा य ने ज्या प्रत्ययांचा प्रारंभ होतो तत्प्रत्ययान्त रूपे आली आणि तस्थिवत्वाल्यांच्या हिश्शास सबंद पद म्हणजे व्यंजनाने ज्याचा प्रारंभ होतो तत्प्रत्ययात रूपे आली. ही त्रिविध वाटणी अगदी सार्वत्रिक आहे. वाटणीचे कारण दुसरे तिसरे काही गूढ नसून फक्त उच्चारसौकर्य हे आहे. स्वरांनी व य ने

ज्यांचा प्रारंभ होतो त्या प्रत्ययाच्या मानगुटीस तस्थुष् हे अंग बेश बसते म्हणून भ चा प्रांत तस्थुष् या अंगाने बनला. व्यंजनादी प्रत्ययांच्या खांद्यावर तस्थिवत् हे अंग नामी बसते म्हणून पद चा प्रांत तस्थिवत् या अंगाने व्यापिला आणि बाकी राहिलेल्या सर्वनामस्थानी टोलेजंग तस्थिवान्स् या अंगाची स्थापना झाली. ही वाटणी का झाली हे कळले म्हणजे मग द्वितीयेच्या द्विवचनानंतर तस्थिवान्स् शब्द द्वितीयेच्या अनेकवचनी तस्थिवान्स् हे बडे रूप सोडून एकदम तस्थुषः हे नमते रूप का धारण करतो व तृतीयेच्या द्विवचनाला पोहोचला असता ताटकन् तस्थिवद् हे तिसरे सोंग का घेतो या चमत्कारांचे इंगित कळते. या सोंगाचे खरे गुह्य पाणिनीला कळले नसल्यामुळे तस्थिवस् शब्दापासून तस्थुष् शब्द संप्रसारणाने व इलोपाने त्याने सिद्ध केला आणि तस्थिवत् शब्द स् स्थानी आणून व अन् चा लोप करून बनविला. वस्तुत: तिन्ही एकवटणारे समाज सवंश्य होते. एक समाज तस्थ् या अंगाला उष् प्रत्यय लावी, दुसरा इवान्स् प्रत्यय लावी आणि तिसरा स् चा सवर्ण जो त्याचा त् स्वीकार करून इवत् प्रत्यय लावी.

११ आता देव शब्दाप्रमाणे तस्थिवांस् किंवा तस्थिवान्स्, तस्थुष् व तस्थिवत् या तीन शब्दांच्या रूपांच्या मिसळीने जी रूपावली वैदिककाली व विशेषत: पाणिनीयकाली बनली तिची साधनिका देतो. सर्वनामस्थानी तस्थिवान्स्, भस्थानी तस्थुष् व पदस्थानी तस्थिवत् ही अंगे धरून साधनिका होते, हे लक्षात ठेवणे अवश्य आहे.

(१) तस्थिवांस् + स् = तस्थिवान्सस् = (दोन्ही स् चा लोप होऊन) तस्थिवान्

✻ पाणिनी तस्थिवत् असा मूळ शब्द धरतो व अंत्याला दीर्घत्व व नुमागम करून तस्थिवान्स् हे अंग तयार करतो. तस्थिवांस किंवा तस्थिवान्स् असा उच्चार काही काल होऊन, नंतर स् चा लोप होऊन तस्थिवान् हे रूप वैदिककाली झाले.

(२) तस्थिवांस् + स् + स् = तस्थिवांस् + अ +उ = तस्थिवांसौ.

✻ अ + उ यांचा संधी अउ म्हणजे औ असा पूर्वी वैदिककाली होत असे. एतत्संबंध विवेचन 'वृद्धि व गुण' या निबंधात सविस्तर केले आहे.

(३) तस्थिवांस् + स् + स् + स = तस्थिवांस् + अ +:+:= तस्थिवांस्:

(४) तस्थिवांस् + अम् = तस्थिवांसम्

✻ अकारान्त शब्दापुढे म् प्रत्यय व अकारान्तेतर शब्दांपुढे अम् प्रत्यय, पाणिनी

अम् प्रत्यय मूळ धरतो व अकारात शब्दाच्या टि चा लोप करून देवं हे रूप साधितो.

(५) तस्थिवांसौ + म् = (म् लोप करून) तस्थिवांसौ.

(६) तस्थुषस् + म् = ( म लोप ) तस्थुष:

(७) तस्थुष् + स्या = तस्थुष् + या = तस्थुष् = या = तस्थुष् + आ = तस्थुषा.

(८) तस्थिवत् + भ्याम् = तस्थिवद्भ्याम्

✲ तस्थिवत् शब्दाचे प्रथमा द्विवचन तस्थिवत् जुनाट भाषेत होत असे हे पाणिनीस माहीत नाही. सबब, पदसंबंधक कार्य असता तस्थिवत् हे अंग धरावे असे तो सांगतो. का धरावे ते कारण अर्थात सांगत नाही.

(९) तस्थिवत् + भिस् = तस्थिवद्भि:

✲ तस्थिवत् शब्दाचे प्रथमेचे अनेकवचन तस्थिवत् असे जुनाट भाषेत होई.

(१०) तस्थुष् + स्ये = तस्थुष् + ह्ये = तस्थुष् + ये = तस्थुष् + ए = तस्तुषे

(११) तृतीया द्विवचनाप्रमाणे ४ x २

(१२) तस्थिवत् + भ्यस् = तस्थिवद्भ्य:

(१३) तस्थुष् + स्यस् = तस्थुष् + ह्यस् (यस् = अस्) = तस्थुष:

(१४) तृतीया द्विवचनाप्रमाणे ५ x २

(१५) चतुर्थी त्रिवचनाप्रमाणे ५ x ३

(१६) पंचमी एकवचनाप्रमाणे ६ x १

(१७) तस्थुष् + स्योस् = तस्थुष् + योस् = तस्थुष + योस् = तस्थुष् + ओस् = तस्थुषो:

(१८) तस्थुष् + स्याम् (याम् = याम् = आम् ) = तस्थुषाम्

(१९) तस्थुष् + स्यि (ह्यि = यि = इ) = तस्थुषि

(२०) षष्ठी द्विवचनाप्रमाणे ७ x २

(२१) तस्थिवत् + स्यु = तस्थिवत्सु.

(२२) तस्थिव ३ न्

✲ संबोधनार्थ तस्थिवान् यातील दीर्घ द्विमात्रक टिं च्या ऐवजी त्रिमात्राक प्लुत अ उच्चारीत. तस्थिवान् या रूपातील शेवटील आ चा ऱ्हस्व होतो म्हणजे अ होतो असे

पाणिनी सांगतो.

व्यंजनात सर्व शब्द या तस्थिवस् शब्दाप्रमाणे सर्वनामस्थान भ व पद अशा विभागाने चालतात. यात स्त्रीलिंगी शब्द पुल्लिंगी शब्दाप्रमाणेच चालतात. स्त्रिलिंगाचे वैभक्तिक निराळे प्रत्यय नाहीत ही बाब लक्षात ठेवण्यासारखी आहे. अकारात पुल्लिंगी शब्द व व्यंजनान्त शब्द यांच्या प्रत्ययांची तुलना करू, प्रथमा व द्वितीया यांचे प्रत्यय दोन्ही शब्दांना सारखे स् व म् हे आहेत, त्यात बदल नाही. परस्थानीय प्रत्यय दोन्ही शब्दांना भ्याम्, भिस् व भ्यस् हे सामान्य आहेत, त्यातही बदल नाही. भस्थानीय प्रत्ययात मात्र भेद आहे तो खालील तखत्यात देतो :

| | आकारान्त | व्यंजनान्त |
|---|---|---|
| ३ x १ | स्येन | स्या ह्व |
| ४ x १ | स्थ | स्ये ह्व |
| ५ x १ | स्यत् | स्यस् ह्व |
| ६ x १ | स्य | स्यस् = |
| ६ x २ | स्योस् | स्योस् = |
| ६ x ३ | स्याम् | स्याम् = |
| ७ x १ | स्यि | स्यि= |
| ७ x २ | स्योस् | स्योस् = |
| ७ x ३ | स्यु | स्यु= |

अकारान्त पुंल्लिगी शब्दांच्या व व्यंजनान्त शब्दांच्या प्रत्ययामध्ये असा भेद का ? भेदाचे कारण एकच संभवते. ते हे की, पूर्ववैदिक आर्यसमाजात एक भाषा केवळ स्वरान्त शब्दांची असे व दुसरी भाषा व्यंजनान्त शब्दांची असे. संस्कृत शब्दाखेरीज करून मराठीत प्राय: प्रत्येक शब्द जसा स्वरान्त असतो. तसा प्रकार प्राय: एका पूर्ववैदिक भाषेचा असे आणि दुसऱ्या पूर्ववैदिक भाषेत प्राय: सर्व शब्द इंग्रजीतल्याप्रमाणे व्यंजनान्त असत. स्वरान्त बोलणाऱ्या समाजाचा व व्यंजनान्त बोलणाऱ्या समाजाचा मिलाफ होऊन वैदिकसमाज बनला.

१२ आता स्वरान्त शब्दापैकी अकारान्तेतर शब्द विवेचनार्थ घेऊ. इ, ई, उ, ऊ, ऋ, ए, ऐ, ओ, औ, व आ असे अकरा स्वर शब्दांच्या शेवटी असतात, नमुन्याकरिता हरि हा

पुंल्लिगी शब्द घेतो.

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | हरिः, हरिँ | हरी<br>हर्यौ | हरयः, हर्यः, हरीन् |
| २ | हरिम् | हरी, हर्यौ | हरीन् |
| ३ | हरिणा | हरिभ्याम् | हरिभिः |
| ४ | हरये | ,, | हरिभ्यः |
| ५ | हरेः | ,, | ,, |
| ६ | ,, | हर्योः | हरीणाम् |
| ७ | हरौ | ,, | हरिषु |
| ८ | हरे | | |

(१) हरि + स् =हरि+ ह्=हरिः, हरिँ

✻ हरिः व हरिँ अशी दोन रूपे होत. अणोऽ प्रगृह्यस्यानुनासिकः या सूत्राचे विवरण व अनुवृत्ती भट्टोजीने अशी केला आहे. अप्रगृह्यस्य अणः अवसाने अनुनासिकः वा स्यात्. अप्रगृह्य अण् अंती विकल्पाने अनुनासिक होतो. प्रायः प्रत्येक स्वर अनुनासिक उच्चारण्याचा कित्येक पूर्व वैदिक समाजाचा स्वभाव होता. ते हरिः हे रूप हरिँ असे सानुनासिक उच्चारीत, सबब ते इथे पुढे साधनिकेत उपयोगी पडणार म्हणून दिले आहे. कोकणे किंवा गुजराथी स्त्रिया ज्याप्रमाणे सर्वच स्वर सानुनासिक उच्चारतात त्याप्रमाणे सानुनासिक उच्चार करणारा एक पूर्व वैदिक समाज होता.

(२) हरि +स्+स् = हरि +अ+उ = हर्यौ

हरि+स्+स् हरिंः =हरिहि =हरिइ = हरी

✻ ऱ्ह = ह चा पूर्वसवर्णत्व पावण्याचा स्वभाव आहे.

✻ औ स्थानीं इ आदेश येतो म्हणून पाणिनी सांगतो.

(३) हरि+स्+स्+स् = हरि+अ+ह्+ह् = हर्यः = (र्य उलगडून) हरयः

हरिँ+स्+स्+स् = हरिँ + इ+ इ+ह् = हरीँ ह् + हरीन्

(४) हरि + म् = हरिम्

(५) हरि + स् + स् + म् = हरि + ह् +ह् + म् = हरि+
:+ : + म् = (म लोप ) हरिहि = हरी

(६) हरीन् + म् = हरीन्
✲ अस् स्थानीं न् येतो म्हणून पाणिनी सांगतो.

(७) हरिँ: + स्या = हरिँह + या = हरिँ या = हरिँ या =
आ = हरिँ आ = हरिञा = हरिणा
✲ रि तील इ अनुनासिक असल्यामुळे आ प्रत्ययाचा उच्चार हरिञा असा होऊन वैदिककाली हरिणा असा झाला, म्हणजे अनुनासिकाचा ण झाला. आ स्थानी ना आदेश होतो म्हणून पाणिनी सांगतो. का होतो ते सांगत नाही.

(८) हरी + भ्याम् = हरीभ्याम् + हरिभ्याम्
✲ उच्चारसौकर्यार्थ व संयोगपरत्वामुळे दीर्घ री चा ऱ्हस्व रि झाला आहे.

(९) हरिस् + स्ये = हरि + ह्ये = हर्ये (ह्ये = ये = ए ) = (उलगडून) हरये.
✲ गुण होऊन ए प्रत्यय लागतो म्हणून पाणिनी सांगतो.

(१०) हरिस् + स्येस् = हरि + एस् = हर्ये: = (साधा उच्चार) हरे:

(११) हरिस् स्येस् = हरे:

(१२) हरि + स्योस् = हरी + ओस् = हर्यो:

(१३) हरी + स्याम् = हरीणाम्

(१४) हरिस् + स्यौ = हर्यौ = (उलगडून ) हरौ

(१५) हरीन् + स्यु = हरीष्यु = हरिष्यु = हरिषु

✲ हरीष्यु यात ष्यु हा संयोग पुढे असल्यामुळे मागील ई ऱ्हस्व उच्चारिली तरी चाले, सबब ऱ्हस्व होऊन हरिष्यु = हरिषु असे रूप उच्चारू लागले.

(१६) हरे !

✻ स्पष्ट व जोरकस संबोधनार्थ प्लुत इ पेक्षां प्लुत ए स्वीकारला.

इकारान्त पुल्लिंगी शब्दांप्रमाणेच उकारान्त पुल्लिंगी शब्द चालतात. यात प्रथमा द्विवचनाची दोन व त्रिवचनाची तीन रूपे आहेत. पैकी हर्य: व हरय: ही एकाच समाजातील जुनी नवी रूपे आहेत. त्या समाजात प्रथमेची रूपे सानुनासिक व निरनुनासिक उच्चारणारे हि दोन भेद होते. या इकारान्त पुल्लिंगी शब्दात भस्थानी म्हणजे तृतीया, चतुर्थी, पंचमी यांच्या एकवचनी आणि षष्ठी व सप्तमी इतक्या स्थानी स्यपासून निघालेले खालील प्रत्यय लागतात :

३ x १ स्या =

४ x १ स्ये =

५ x १ स्येस् ह्न

६ x १ स्येस् ह्न

७ x १ स्यौ ह्न

६ x २ स्योस् =

६ x ३ स्याम् =

७ x २ स्योस् =

७ x ३ स्यु =

पैकी स्येस् व स्यौ हे दोन प्रत्यय इकारान्त व उकारान्त पुल्लिंगी शब्दांपुढे अकारान्त व व्यंजनान्त शब्दांपुढल्या प्रत्यययांहून निराळे आहेत.

१३ इकारान्त व ऊकारान्त पुल्लिंगी शब्दांसंबंधाने विशेष सांगण्यासारखे नाही. कित्येक शब्दांचे द्वितीयेचे अनेकवचन नकारान्त असते व कित्येकांचे विसर्गान्त असते. ऋकारान्त शब्दांसंबंधाने विशेष सांगण्यासारखी बाब म्हटली म्हणजे त्यांचे पंचमीचे व षष्ठीचे एकवचन तुरन्त असते. कर्तृ + स्युस् = कर्तृ: र चा उच्चार उ मध्ये मिळून गेला इतकेच. हा असा र चा उ होतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. पती व सखी या शब्दांसंबंधाने पुढे विवेचन व्हावयाचे आहे. तेव्हा या बाबींचा उपयोग होणार आहे. ऋकारान्त शब्दांपैकी कित्येक शब्द सर्वनामस्थानी ऋ चा आर् करतात व कित्येक अर् करतात. पैकी अर् करणारे शब्द जुनाट होत. बाकी अकारान्त, इकारान्त व व्यंजनान्त शब्दांसंर्वधाने जी टीका केली ती च या ऋकारान्त शब्दांनाही लागू आहे. एकारान्त, आणि ऐकारान्त शब्दांसंबंधाने काहीच नवीन सांगण्यासारखे नाही. ओकारान्त व औकारान्त शब्दांपैकी गो शब्द लक्ष आहे. या

शब्दाच्या पूर्ववैदिक समाजात चार विधा होत्या, (१) गौ, (२) गो, (३) गा व (४) गव्. शिवाय समासात गु शब्द येई ती पाचवी. या चारी शब्दांची रूपे गो शब्दाच्या पाणिनीय रूपावलीत येतात. याचा समाजदृष्ट्या अर्थ एवढाच की, पूर्ववैदिककालीं हे चार शब्द निरनिराळे चार समाज बोलण्यात आणीत. गो शद्ब स्त्रीलिंगी व पुल्लिंगी सारखा च चालतो हे ध्यानात घेण्यासारखे आहे.

१४ आता अजन्त स्त्रीलिंगी शब्दांचा विचार, अकारान्त स्त्रीलिंगी शब्द वैदिकभाषेत आले नाहीत. पूर्ववैदिकभाषेत अकारान्त स्त्रीलिंगी शब्द असावेत असा तर्क, अंब, अक्क व अल्ल या अकारान्त संबोधनरूपावरून होतो. इकारान्त नदी शब्द प्रथम मासल्याला घेतो. वैदिककाली हा शब्द असा चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | नदी<br>नदी: | नद्यौ<br>नदी | नद्य:, नदी:, नदीं: |
| २ | नदीम् | नद्यौ<br>नदी | नदी: |
| ३ | नद्या | नदीभ्याम् | नदीभि: |
| ४ | नद्यै | ,, | नदीभ्य: |
| ५ | नद्या: | ,, | ,, |
| ६ | ,, | नद्यो: | नदीनाम् |
| ७ | नद्याम् | ,, | नदीषु |

साधनिका अशी :

(१) नदी + स् = नदी:

नदी + स् = नदी + : = नदीही = नदीई = नदी

(२) नदी + स् + स् = नदी + अ+ उ = नद्यौ

नदी + स् + स् = नदी + ह = नदी: = नदीहि = नदीई = नदी

(३) नदी + स् + स्+ स् = नदी + अ+ स् = नद्य:

नदी + स् + स्+ स् = नदी + ह = नदी:, नदीँ:

(४) नदी + म् = नदीम्

(५) नद्यौ + म् = नद्यौ (मलोप )

(६) नदी: + म् = नदी: (मलोप)

(७) नदी + स्या = नद्या

(८) नदी + भ्याम् = नदीभ्याम्

(९) नदी: + भिस् = नदीहि + भिस् = नदीई + भिस् = नदीभि:

(१०) नदी + स्यै = नद्यै

(११) नदी + भ्याम् = नदीभ्याम्

(१२) नदी: + भ्यस् = नदीभ्या:

(१३) नदी + स्यास् = नद्या:

(१४) नदी + भ्याम् = नदीभ्याम्

(१५) नदी: + भ्यस् = नदीभ्य:

(१६) नदी + स्यास् = नद्या:

(१७) नदी + स्योस् = नद्यो:

(१८) नदीँ: + स्याम् = नदीनाम्

(१९) नदी + स्याम् = नद्याम्

(२०) नदी + स्योस् = नद्यो:

(२१) नदी: + स्यु = नदीषु

(२२) नदि

वधू शब्द नदीप्रमाणे, भस्थानी स्या, स्यै, स्यास्, स्योस्, स्याम्, स्यु हे प्रत्यय येतात. पैकी स्यास् व स्यै हे प्रत्यय नवीन आहेत. बाकीचे प्रत्यय अजन्त व व्यंजनान्त पुल्लिंगी

प्रत्ययासारखे दिसणारे आहेत. नदी शब्दाची ही प्रथमैकवचनाची दोन, प्रथमा द्विवचनाची दोन व प्रथमा त्रिवचनाची तीन रूपे येतात. अर्थात् ही तीन रूपे योजणारे पूर्ववैदिककाली तीन समाज होते, हे नदी शब्दाच्या रूपावरूनही सिद्ध होते.

१५ पाणिनीयकाली मति व वधु हे इकारान्त व उकारान्त शब्द स्त्रीलिंगी समजत. पूर्ववैदिककालीं एक समाज इकारान्त व उकारान्त स्त्रीवाचक शब्द पुल्लिंगी समजे व दुसरा स्त्रीलिंगी समजे. या दोन समाजाचा वैदिककाली मिलाफ झाला आणि इकारान्त व उकारान्त स्त्रीवाचक शब्दांची स्त्रीलिंगी व पुल्लिंगी अशी दोन्ही रूपे कित्येक ठिकाणी वैदिकभाषेत शिरली. जसे :

## मति व धेनु

### यांची रूपे

| | पुल्लिंगी हरि व गुरु शब्दांप्रमाणे | स्त्रीलिंगी नदी व वधु शब्दांप्रमाणे |
|---|---|---|
| ४ | मतये | मत्यै |
| | धेनवे | धेन्वै |
| ५ | मते: | मत्या: |
| | धेनो: | धेन्वा: |
| ६ | मते: | मत्या: |
| | घेनो: | धेन्वा: |
| ७ | मतौ | मत्याम् |
| | धेनौ | धेन्वाम् |

बाब इतकी उघड आहे की, जास्त टीका करण्याची जरूर नाही. मतिचे पुल्लिंगी हरि शब्दाप्रमाणे मतौ व स्त्रीलिंगी नदी शब्दाप्रमाणे मत्याम् अशी दोन रूपे का व्हावीत याचा

आचंबा प्रथमदर्शनी वाटतो. परंतु पूर्ववैदिककाली मति व धेनु हे शब्द पुल्लिंगी मानणारे काही लोक होते व स्त्रीलिंगी मानणारे काही लोक होते हा इतिहास कळला म्हणजे अचंब्याचे भर्यवसान समाधानात होते.

१५ अजन्त स्त्रीलिंगी शब्दांपैकी आकारान्त स्त्रीलिंगी शब्द राहिले त्यांचे पृथक्करण येणेप्रमाणे. नमुन्याला रमा शब्द घेऊ. या रमा शब्दाच्या म्हणजे आकारान्त स्त्रीलिंगी शब्दाच्या पूर्ववैदिककाली दोन विधा असत. एक रमाय् असा शब्द व दुसरा रमय् असा शब्द म्हणजे मूळचे आकारान्त स्त्रीलिंगी सर्व शब्द यकारान्त होते. रमाय् शब्द असा चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | रमाय् | रमायौ<br>रमाय् | रमायः, रमाय् |
| २ | रमायम् | ,, | ,, ,, |
| ३ | रमाया | रमाभ्याम् | रमाभिः |
| ४ | रमायै | ,, | रमाभ्यः |
| ५ | रमायाः | ,, | ,, |
| ६ | रमायाः | रमायोः | रमायाम् |
| ७ | रमायाम् | ,, | रमासु |
| ८ | रमाय् | | |

रमय् शब्द असा चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | रमा | रमे, रमयौ<br>रमय् | रमः, रमयः,रमाँः |
| २ | रमाम् | रमे | रमाः |
| ३ | रमया | रमाभ्याम् | रमाभिः |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | रमयै | ,, | रमाभ्य: |
| ५ | रमया: | ,, | ,, |
| ६ | ,, | रमयो: | रमाणाम् |
| ७ | रमयां | ,, | रमासु |
| ८ | रमय्, रमे | | |

या दोन रूपांचा मिलाफ होऊन खालील रूपावली निपजली :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | रमा | रमे, रमा | रमा:, रमाँ: |
| २ | रमाम् | रमे | रमा: |
| ३ | रमया | रमाभ्याम् | रमाभि: |
| ४ | रमायै | ,, | रमाभ्य: |
| ५ | रमाया: | ,, | ,, |
| ६ | ,, | रमयो: | रमाणाम् |
| ७ | रमायाम् | ,, | रमासु |
| ८ | रमे | | |

साधनिका अशी:ह्व

(१) रमय् + स् = रमय् + ह् = रमअ + अ = रमा

✼ स् चा लोप होतो म्हणून पाणिनी सांगतो.

(२) रमय् + स् + स् = रमइ + : +: = रमइ + हि + हि = रमइ + इ + इ = रमे

✼ औ स्थानी इ आगम होतो म्हणून पाणिनी सांगतो.

(३) रमय् + स् + स् + स् = रमअ + ह् = रमा:, रमाँ:

(४) रमा + म् = रमाम्

(५) रमे + म् = रमे

(६) रमा: + म् = रमा:

(७) रमय् + स्या = रमया

✻ आ चा ए होतो म्हणून पाणिनी सांगतो.

(८) रमा + भ्याम् = रमाभ्याम्

(९) रमा: + भिस् = रमाभि:

(१०) रमाय् + स्यै = रमायै

✻ याडागम होतो म्हणून पाणिनी सांगतो.

(११) रमा + भ्याम् = रमाभ्याम्

(१२) रमा: + भ्यस् = रमाभ्य:

(१३) रमाय् + स्यास् = रमाया:

(१४) रमा + भ्याम् = रमाभ्याम्

(१५) रमा: + भ्यस् = रमाभ्य:

(१६) रमाय् + स्यास् = रमाया:

✻ याडागम पाणिनीचा.

(१७) रमय् + स्योस् = रमयो:

✻ आ स्थानी ए म्हणून पाणिनी सांगतो.

(१८) रमाँ: + स्याम् = रमाणाम्

✻ नुमागम पाणिनी सांगतो.

(१९) रमाय् + स्याम् = रमायाम्

(२०) रमय् + स्योस् = रमयो:

(२१) रमाः + स्यु = रमासु

(२२) रमय् = रमइ = रमे

✻ आ स्थानी ए होतो म्हणून पाणिनी सांगतो.

येथे सर्व प्रत्यय नदी शब्दाच्या प्रत्ययाप्रमाणे आहेत. पूर्ववैदिक भिन्न समाज, भिन्न भाषा बोलणारे होते व त्यांचा मिलाफ होऊन वैदिकसमाज व भाषा निष्पन्न झाली, असे हाही शब्द सांगतो.

१६ इकारान्त पति व सखि शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. पति शब्दाची खालील रूपे हरि शब्दाच्याप्रमाणे चालतात.

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | पतिः | पती | पतयः |
| २ | पतिम् | पती | पतीन् |
| ३ | | पतिभ्याम् | पतिभिः |
| ४ | | ,, | पतिभ्यः |
| ५ | | ,, | ,, |
| ६ | | | पतीनाम् |
| ७ | | | पतीषु |

पति शब्दाची खालील रूपे कर्तृ शब्दाच्याप्रमाणे चालतात :

३ x १ पत्या

४ x १ पत्ये

५ x १ पत्युः

६ x १ पत्युः

६ x २ पत्योः

७ x २ पत्योः

इतकेच की, कर्त्रा, कर्त्रे, कर्त्रोः या रूपातल्या प्रमाणे पत्या इत्यादी शब्दांत रकार

नाही. तो रकार जर घातला तर मूळशद्ध पत्यृ असा होतो व त्याचे षष्ठी एकवचनाचे रूप कर्तृ: प्रमाणे पत्यु: असे होते.

पति शब्दाचे पत्यौ रूप गुरु शब्दाच्या किंवा हरि शब्दाच्या सप्तमी एकवचनी रूपाप्रमाणे दिसते. म्हणजे मूळशब्द पत्यि किंवा पत्यु होतो.

याचा अर्थ असा की, पति शब्दाचीं रूपे १) पति २) पत्यृ व ३) पत्यि किंवा पत्यु या तीन शब्दांच्या रूपाच्या भेसळीने झाली आहेत. पैकी पति शब्द सर्वांच्या दाट ओळखीचा आहे. पत्यृ व पत्यि किंवा पत्यु हे शब्द मात्र कोणत्याच कोशात किंवा निघंटूंत सापडावयाचे नाहीत. पत्यृ काय? कशाचा अपभ्रंश असावा? शब्द मोठा मनोरंजक आहे, सबब, त्याचे मूळ शोधून काढण्याचा यत्न करितो. स्त्री असा शब्द आहे. हा शब्द ई प्रत्यय कोणत्या तरी ऋकारान्त शब्दाला लागून झालेला आहे. स्त्यायतेर्ड्रट् या उणादिसूत्रानें रत्यै संघाते या भ्वादि धातूपासून स्त्री शब्द निर्वचिण्याचा प्रघात आहे व तो रास्त आहे. संघातीकरण म्हणजे एका ठिकाणीं जुळवाजुळव किंवा मांडामांड करणे. अशी जुळवाजुळव किंवा मांडामांड करणारी जी तिला जुनाट पूर्ववैदिकभाषेत स्त्यी म्हणत. या स्त्यी शब्दाचा अपभ्रंश स्त्री. स्त्यी ह्र जुळवाजुळव कशाची करी? तर घराची. पस्त्यं असा एक जुनाट शब्द आहे. त्याचा अर्थ घर पस्त्यं हा शब्द स्त्यै धातूपासून काढतात. अपस्त्यायते संघातीभवति पस्त्यं असे निर्वचन क्षीरस्वामीने अमरटीकेत केले आहे. लाकडे, माती, दगड, यांच्या संघाताने जे बनलेले ते पस्त्यं. लाकडे, माती, दगड यांचा संघात करणारा जो पुरुष त्याला अतिजुनाटकालीं पस्त्यृ म्हणत. अपस्त्यै धातूला ऋ प्रत्यय लागून अतिजुनाट भाषेत अपस्त्यृ व (अलोप होऊन) परस्त्यृ असा शब्द निर्माण झाला. ऋ प्रत्यय लागून कर्त्रर्थक शब्द जुनाट भाषेत होत. पैकी जुनाटभाषेतून वैदिकभाषेत आलेले देवृ व नृ हे शब्द प्रसिद्ध आहेत. दिवे ऋ: व नयते डिंच्च या उणादिसूत्रात दिव् व नौ धातूंना ऋ प्रत्यय लागून देवृ व नृ हे शब्द होतात म्हणून सांगितले आहे. ऋ प्रत्यय लागण्यापूर्वी टि चा लोप होतो. तद्वत् स्त्यै यातील ऐ चा लोप होऊन व ऋ प्रत्यय लागून अपस्त्यृ ह्र पस्त्यृ शब्द निर्माण झाला. हा पस्त्यृ शब्द इतका जुनाट आहे की, वेदकाली तो वैदिक भाषेत आला नाही. अपपूर्वक स्त्यैपासून जसा पस्त्यृ शब्द निघाला तसा नुसत्या स्त्यै धातूपासून रस्त्यृ शब्द पूर्ववैदिककालीं निघाला. स्त्यृ म्हणजे दगड, माती, लाकडे इत्यादीची जुळवाजुळव करून घर करणारा. स्त्यृ या पुल्लिंगी शब्दाला ई प्रत्यय लागून स्त्रींलिंगी स्त्यी शब्द झाला. या स्त्यी शब्दाचा अपभ्रंश स्त्री हा शब्द वेदात आढळतो, स्त्यी शब्द आढळत नाही. म्हणजे स्त्यी शब्द वेदकाली लुप्त होऊन गेला होता. स्त्री शब्द चालविताना स्त्यी या जुन्या शब्दाची जरूर पडणार आहे, सबब हा जुना शब्द ध्यानात ठेवावा. स्त्यृ ऊर्फ पस्त्यृ व स्त्यी अशी दोन

नवराबायको पूर्ववैदिककाली पस्त्य म्हणजे घर सजवीत. पस्त्यृ शब्दाचा कालाने पहिला अपभ्रंश स् चा ह् चा त् होऊन पत्त्यृ. अन्त्य ऋ चा लोप होऊन पत्त्यृ शब्दाचा एक अपभ्रंश पत्य् व दुसरा अपभ्रंश ऋ चा उ होऊन पत्त्यु. पत्त्य् शब्दाचा अपभ्रंश वैदिक पति ह्य म्हणजे चार पायऱ्या झाल्या. पस्त्यृ उच्चार करणारा पहिला समाज. पत्त्यृ उच्चारणारा पहिल्या समाजाचा वंशज दुसरा समाज. या दुसऱ्या समाजाचा वंशज पत्य् उच्चार करणारा तिसरा समाज आणि शेवटी पति उच्चार करणारा चवथा म्हणजे वैदिकसमाज, तात्पर्य, ऋग्वेदकालीन भाषेच्या पूर्वी तीन भाषा होऊन गेल्या होत्या तेव्हा पस्त्यृ हा शब्द बोलण्यात व वापरण्यात येत होता. ऋग्वेदाचा काल आजपासून पाच हजार वर्षापूर्वीचा धरला व प्रत्येक भाषेची यात १५०० वर्षाची धरिली तर पस्त्यृ शब्द वापरणारा समाज ऋग्वेदकालीन समाजाच्या ४५०० किंवा ५००० वर्षे मागे जातो व आपल्या वर्तमानकाळाच्या दहा हजार वर्षे पाठीमागे जातो. पस्त्यृ शब्दाचा अपभ्रंश जो पत्त्यृ जो पत्त्यृ अथवा पत्त्यृ शब्द तो येणेप्रमाणे चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | पत्या | पत्यारौ | पत्यार: |
| | | पत्यरौ | पतार: |
| २ | पत्यारं | ,, | पत्यृस् |
| ३ | पत्र्या | पत्यृभ्याम् | पत्यृभि: |
| ४ | पत्र्ये | ,, | पत्यृभ्य: |
| ५ | पत्त्यु: | ,, | ,, |
| ६ | ,, | पत्त्यो: | पत्त्यृणाम् |
| ७ | पत्र्यि | ,, | पत्त्यृषु |
| ८ | पत्यर् | | |

।। श्री शिवनाथो विजयते ।।

पत्य् शब्द यकारान्त आहे. जसा कर्तृ शब्द ऋकारान्त आहे तसा हा पत्य् शब्द यकारान्त आहे हे लक्षात बाळगिले पाहिजे. त च्या खाली ऋ लिहून तृ दाखविला जातो, तसा त् च्या खाली य् लिहून त$_{य}$ दाखविला म्हणजे पूर्ववैदिक चवथ्या पायरीचा त$_{य}$ काय होता त्याची कल्पना येईल. सांगण्याचा मुद्दा हा की, य् हा उच्चार अत्यंत जुनाट पूर्ववैदिककालीं ऋ सारखा स्वर होता. तपृ शब्द येणेप्रमाणे त्या अत्यंत जुनाटकाली चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | पता | पतायौ | पताय:, प तृ$_{य}$न् |
| २ | पतायम् | पतायौ | प तृ$_{य}$न् |
| ३ | पत्या | पतिभ्याम् | पतिभि: |
| ४ | पत्ये | '' | पतिभ्य: |
| ५ | पत्यु: | '' | '' |
| ६ | '' | पत्यो: | पतीनाम् |
| ७ | पतयि | '' | पतिषु |
| ८ | पतय् | | |

पत्यु शब्द पुल्लिंगी गुरु शब्दाप्रमाणे चाले :

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| ७ | पत्यौ | | |

येणेप्रमाणे पति या वैदिक शब्दाच्या रूपात पत्यृ, पत$_{य्}$, पत्यु व पति या चार शब्दांची रूपे मिसळली आहेत. अर्थात् पूर्ववैदिक तीन समाज निरनिराळ्या बोली बोलणारे होते हे या ही शब्दावरून सिद्ध होते. पत$_{य्}$ शब्दाचे पताय् म्हणून एक जुनाट रूप वर दिले आहे. अशी जुनाट रूपे वैदिक भाषेत आणिक काही शब्दांच्या स्त्रीलिंगी रूपात दृष्टीस पडतात. जसे वृषाकपायी अग्नायी, कुसिदायी, कुसितायी, मनायी. या स्त्रींलिंगी शब्दांची पुल्लिंगे कपाय्, अग्नाय्, कुसिदाय्, मनाय अशी पूर्ववैदिक भाषेत होती हे उघड आहे.

१७ पति व स्त्री हे दोन शब्द एकाच स्त्यै संघाते या धातूपासून निघालेले असून, घर करणारे स्त्रीपुरुष असा याचा अर्थ आहे. गृहात किंवा पस्त्यांत गृयाग्नि ठेविण्याची चाल रानटी आर्यात फार पुरातन कालापासूनची आहे. सबब, पति व स्त्री या व्यक्तींची योग्यता आर्यसंस्कृतीत अतोनात गणिली आहे. कारण, त्या दोघांचे मुख्य काम अग्नि रक्षण करणे हे असे. स्त्यृ चे स्त्रीलिंग स्त्री म्हणून सांगितले. तसे पस्त्यृ चेही स्त्रीलिंगी रूप असे. पस्त्यृ चा शेवटचा अपभ्रंश जो पति शब्द त्याचे स्त्रींलिंग पत्नी होते म्हणून पाणिनी सांगतो. येथे असा प्रश्न उभा रहातो की, पत्नी शब्दांत न काय म्हणून एकाएकी आला ? पत्यू र्नो, या सूत्रांत पाणिनी सांगतो की, स्त्रियाम् न होतो. होतो हे कुकुले बाळही सांगेल. का होतो?

या प्रश्नाच्या उत्तर द्यावयाला जुनाट पूर्ववैदिक भाषेकडे वळले पाहिजे. पत$_{य्}$ शब्दाला आनी प्रत्यय लागून जुनाट भाषेत पत्यानी असे. स्त्रींलिंगी रूप होत असे. इंद्रवरुणभर्वादी शब्दांना जसा आनौ प्रत्यय लागतो तसा पत$_{य्}$ शब्दाला आनी प्रत्यय लागे, पत्यानी शब्दाचा अपभ्रंश पत्नी. परनी यातील नीवरून दिसते की जितका इद्रं देव आर्यलोकात जुनाट तितकाच किंवा त्याहूनही जास्त पस्तृ, पत्य् ही व्यक्ति आर्यलोकात जुनाट. वैदिककाली यज्ञसंयोग असे इतर गौण स्त्रियांना भार्या वगैरे इतर संज्ञा असत. पत्नी ही पस्त्य म्हणजे घर व घराकतील अग्नी चालविणारी व राखणारी पति इतकीच प्रधान असे हे वर दाखविलेच आहे, तेव्हा यज्ञ आणि पत्नी यांचा बोलण्यात नित्य संयोग असावा, यात नवल नाही. इतकेच नव्हे, तर पति हा पुल्लिंगी शब्द मालक या अर्थी स्त्रीला वैदिककाली लागत असे व चमत्कार म्हणून तो पाणिनीने गृहपति: स्त्री असा नमूद केला आहे. चमत्काराचे कारण पाणिनीला माहीत नव्हते. पूववैदिककालीन एक समाज बोलण्यात व भाषेत लिंगभेद करीत नसे, स्त्रीशब्दांना व पुंशब्दांना एकच प्रत्यय लावीत असे. या लिंगविहीन भाषेचा अवशेष गृहपति:, मनु:, इत्यादी रूपाच्या आकाराने भाषेत राहिलेला पाणिनीने दाखल केला आहे.

१८ पत$_{य्}$, क्रत$_{य्}$, कप$_{य्}$ मन$_{य्}$ या पूर्ववैदिक य् स्वरान्त शब्दांच्या जोडीला सख$_{य्}$ शब्द बसवावा लागतो. पाणिनी हा सख शब्द सखि असा लिहितो. कर्तृ यातील ऋ प्रमाणे सख यातील य् स्वर इ स्वराहून व य् व्यंजनाहून निराळा होता याचे ज्ञान पाणिनीला नव्हते. ऋ चे जसे आर् होते तसे य् स्वराचे आय् होई हेही त्याला माहीत नव्हते. मूळी पूर्ववैदिकभाषेत या पत खालील स्वराचा उच्चार च इंग्रजीतील आय् शब्दाप्रमाणे हुबेहूब होत असे. वैदिकभाषेत स्वर बदलेले आणि या पत$_{य्}$ खालील स्वराचा उच्चार ऐ सारखा होऊ लागला. यासंबंधित 'वृद्धि व गुण' हा निबंध पहावा. पत$_{य्}$ व सख$_{य्}$ या खुणांनी दाखविलेला उच्चार वैदिकभाषेत उच्चारावयाचा व लिहावयाचा म्हणजे पताय् व सखाय् असा उच्चारावा व लिहावा लागे. त्याचप्रमाणे पूर्व वैदिकभाषेत कर्तृ खालील स्वराचा उच्चार अर् किंवा आर् होत असे. कर्तृं चा कर्तार् व मातृचा मातर् उच्चार सर्वनास्थानी का होतो त्याचे बीज ऋ चे हे पूर्ववैदिक उच्चार होत. आर् व अर् चा उच्चार पाणिनिकाली ऋ झाल्यामुळे व पूर्ववैदिक कर्तारौ व मातरौ हे द्विवचनाचे वगैरे उच्चार पाणिनीयभाषेत पूर्ववैदिकभाषेतून जसेच्या तसे आल्यामुळे ऋ च अर् व आर् होतो व या होण्याला वृद्धिकार्य किंवा गुणकार्य म्हणतात इत्यादी कारणे वैयाकरणांना देणे भाग पडले. असो. सख$_{य्}$ शब्द येणेप्रमाणे चालतो :

(१) सखाय् + स् = सखाय् = सखाअ = सखा

(२) सखाय् + स् + स् + = सखायौ

(३) सखाय् + स् + स् + स् = सखाय:

(४) सखाय् + म् = सखाय्म् = सखायम् (उलगडून )

(५) सखायौ + म् = सखायौ (मलोप )

बाकीची रूपे पति शब्दाप्रमाणे, पति शब्दाच्या प्रमाणे सर्वनामस्थानी सखि:, सखी, सखय:, सखिं, सखी, अशी रूपे सख$_{य}$शब्दांची का आली नाहीत याचे कारण इतकेच की, पत$_{य}$ शब्दाचा अपभ्रंश जो पति शब्द झाला तसा सख$_{य}$ शब्दाचा अपभ्रंश जो सखि शब्द त्याची सखि: वगैरे नवी रूपे लोकांना गोड वाटली नाहीत, सख$_{य}$ शब्द सपूर्वक ख्या धातूपासून य् प्रत्यय लागून पूर्ववैदिककाली झालेला आहे. दिव् ला ऋ लागून जसा देवृ तसा च् ख्याला य् लागून सख$_{य}$ कृदन्त बनलें. सख$_{य}$ म्हणजे अन्योन्य समागमात सुखसकथा करणारा. सजुष्प्रमाणे हा सख$_{य}$ शेब्द आहे. सख$_{य}$, सखाय्, सखि व सख्यु या चार शब्दांच्या रूपांची भेसळ पाणिनीय सखि शब्दाच्या रूपात झालेली स्पष्ट दिसते. त्यापासून समाजसंबंधक अनुमान पूर्वीप्रमाणे बांधावयाचे. सखि शब्दापासून प्रथमकैवचनाचा सखा शब्द साधावयाला पाणिनीला फार प्रयास पडले प्रथम अंत्य इ चा लोप, नंतर अन् आदेश नंतर न् लोप व शेवटी अ ला दीर्घत्व, इतके सव्यापसव्य करावे लागले. हा अनैतिहासिक प्रकार पाणिनीच्या सूत्रात सडकून आहे.

१९ ऋ व य् हे दोन स्वरान्त शब्द पूर्ववैदिक भाषात होते. त्याप्रमाणे लु या स्वरान्त शब्दही असावेत. गम$_{लृ}$ व शक$_{लृ}$ हे अनुकरणात्मक शब्द समजतात. परंतु ऋलृ चे सावर्ण्य पूर्ववैदिकभाषात होत असावे. विशेषत: अडाणी व बाले यांच्यात ऋ चा उच्चार ऌ करीत असावे. कर्तृ चा उच्चार कत्त$_{लृ}$ असा होत असावा. हे ऌकारान्त शब्द ऋकारान्त किंवा य्कारान्त शब्दाप्रमाणे चालत. तात्पर्य य्, ऋ व ऌ या स्वरान्त शब्द पूर्ववैदिकभाषात होते. आकारान्त स्त्रीलिंगी शब्द मूळचे य् स्वरान्त होते, हे रमा शब्द चालविताना दिसून आलेच आहे. व् स्वरान्तही शब्द पूर्ववैदिकभाषेत असावे. ग्व् (म्हणजे धेनू) हा शब्द मूळचा व्स्वरान्त असावा व तो असा

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १ | गा | गावौ | गाव: |
| | | गवौ | गव: |
| २ | गावम् | ,, | गाव: |
| | गवम् | ,, | गून् |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ग्वा | ग्वभ्याम् | ग्वभि: |
| ६ | गु: | ग्वो: | गूनाम् |

असा चालत असावा. पैकी गूनाम् याचा अपभ्रंश गोनाम् हे रूप वेदांत येते.

२० स्त्री, धी इत्यादी शब्दांच्या स्त्रिया, धिया वगैरे रूपात यकार येतो. त्याचे कारण पूर्ववैदिककाली या शब्दांची रूपे स्त्यी, घ्यी अशी यकारामय होती हे होय. मूळ धातूत यकार असल्यामुळे त्यापासूनच्या कृदन्तांतही तो यकार सहजच आला.

ध्यी + आ = धि य् + आ = धिया

स्त्यी + आ = स्त्रि यं + आ = स्त्रिया

भ्वू + आ = भु व + आ = भुवा

✻ पूर्ववैदिककाली भू धातूचे मूळरूप भ्वू असे असावे.

अनुकरणाने इतर इकारान्त इ.इ.इ. अर्वाचीन शब्दांच्याही रूपात यकार शिरला.

२१ अजन्त शब्दांपैकी स्त्रीवाचक शब्दांचे भस्थानीय प्रत्यय पुंवाचक शब्दांच्या भस्थानीय प्रत्ययांहून कोठेकोठे भिन्न आहेत. त्यांचा तक्ता खाली देतो. कोठेकोठे भस्थानीय प्रत्ययांमागे स्त्रीवाचक शब्दांचे अंग पुरुषवाचक शब्दांच्या अंगाहून निराळे असते तेही तक्त्यात दाखवितो :

| | १ | | २ | |
|---|---|---|---|---|
| | आ | | इ उ | |
| | पुं | नित्यस्त्री प्रत्यय | नित्यपुंप्रत्यय | पुंस्त्रीप्रत्यय |
| विभक्ति वचन | गोपा | रमा | हरि गुरु | मति धेनु |
| २ x ३ | गोप: | रमा: | हरीन् गुरून् | मती: धेनू: |
| ३ x १ | स्या | स्या | स्या | स्या |
| ४ x १ | स्ये | स्यै | स्ये | से, स्यै |
| ५ x १ | स्यस् | स्यास् | स्येस् स्योस् | स्येस् स्योस्, |
| ६ x १ | स्यस् | स्यास् | स्येस् स्योस् | स्येस् स्योस्, स्यास् |
| ७ x १ | स्यि | स्याम् | स्यौ स्यौ | स्यौ, स्याम् |
| | १ | २ | ३ | ३ x २ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३ | | | ४ | ५ |
| | ई ऊ | | | ऋ | ए ऐ ओ औ |
| | नित्यपुं प्रत्यय | नित्यस्त्रीप्रत्यय | पुंस्त्रीप्रत्यय | पुं-स्त्रीशब्द | पुं-स्त्रीशब्द |
| | वातप्रमी खलपू | नदी | धी भू | पितृ मातृ | से रै गो नौ ग्लौ |
| विभक्ति वचन | वातप्रमीन् खलप्व: | नदी: | धिय: भुव: | पितृन् मातृ: | सय: राय: गा: नाव: ग्लाव: |
| ३ x १ | स्या | स्या | स्या | स्या | स्या |
| ४ x १ | स्ये | स्यै | स्ये, स्यै | स्ये | स्ये |
| ५ x १ | स्यस् | स्यास् | स्यस्, स्यास् | स्युस् | स्यस् |
| ६ x १ | स्यस् | स्यास् | स्यस्, स्यास् | स्युस् | स्यस् |
| ७ x १ | स्यि | स्याम् | स्यि, स्याम् | स्यि | स्यि |
| | १ | २ | १ x २ | १ | १ |

तक्त्यातील पाचव्या कंसात रै व गौ हे शब्द स्त्रीलिंगी व पुल्लिंगी सारखेच चालतात. म्हणजे यांना स्त्रीलिंगी व पुल्लिंगी सारखेच प्रत्यय लागतात याचा अर्थ असा की, विभक्तिप्रत्ययावरून लिंग दाखविण्याची युक्ति निघण्यापूर्वीचे हे रै व गौ शब्द आहेत. गा:, गौ:, गवा या रूपांवरून बैल विवक्षित आहेत की गाई विवक्षित आहेत ते सांगता येत नाही, त्यांच्या पाठीमागे इमा:, एव: इत्यादी विशेषणे जेव्हा लावावी तेव्हा स्त्री की पुरुष हे ज्ञान होते. हलन्त स्त्री किंवा पुं शब्दांना ज्याप्रमाणे सारखेच विभक्तिप्रत्यय लागतात त्याचप्रमाणे रै व गो या शब्दांना दोन्ही लिगी एकच विभक्तिप्रत्यय लागतात. दुसऱ्या रीतीने बोलावयाचे म्हणजे रै व गौ शब्द जेव्हा प्रचलित झाले तेव्हा पूर्ववैदिकसमाजात लिंगदर्शक निराळे विभक्तिप्रत्यय नव्हते. गो हा शब्द प्रचारात फार असल्यामुळे त्याची जुनाट रूपे जशीची तशीच पाणिनीपर्यंत पोहोचली. पाचव्या कंसांतील पुल्लिंगी ग्लौ शब्द व स्त्रीलिंगी नौ शब्द हे शब्दही गो शब्दाइतके च जुनें असून यांना सारखेच विभक्तिप्रत्यय लागतात. अत्यंत पुरातनकाली आर्यभाषात लिंगभेददर्शक विभक्तिप्रत्यय नव्हते हे उघड आहे. चवथ्या कंसात पितृ व मातृ हे जुनाट शब्द आहेत, पितृ पुं वाचक आहे व मातृ स्त्री

वाचक आहे, असे वैदिककाली मानीत व पाणिनीयकाली मानीत, परंतु पूर्ववैदिककालच्या अत्यंत जुनाट थरात हे दोन्ही शब्द स्त्री पुंभेदवाचक नव्हते. कारण या दोन्ही शब्दांना एकच विभक्तिप्रत्यय, हे प्रत्यय अस्तित्वात आल्यावर लागू लागले. पाणिनीय व छांदसभाषेत पितृ व मातृ यांच्या रूपात एका स्थली मात्र भेद आहे. ते स्थल द्वितीयात्रिवचन हे होय, पितृन् व मातृः अशी भिन्न रूपे पाणिनी देतो. परंतु एकेकाळी पितृन् व मातृन् अशी सारखीच रूपे होती याला ज्ञापक आहे. मातृ शब्दाचे षष्ठीचे अनेकवचन मातृणाम् असे पाणिनीयभाषेत होते. प्रथमेच्या अनेकवचनी मातृ शब्दाची रूपे मातृँः मातृन् असल्याशिवाय, मातृणाम् हे रूप सिद्ध व्हावयाचे नाही अशी अपरिहार्यता असल्यामुळे, पितृन्प्रमाणे मातृन् असे द्वितीयाअनेकवचनी रूप जुनाटकाळी होते हे स्पष्ट आहे. तात्पर्य, जुनाटकाळी पितृ व मातृ या शब्दांना एकच प्रत्यय लागत. पुढे कालान्तराने वैदिकभाषा अस्तित्वात येत असताना विभक्तिप्रत्ययानी भेद दर्शविण्याकडे लक्ष जाऊ लागले व पितृन रूपापासून मातृः रूप विभेदू लागले. मातृः रूपाच्या अंती जो विसर्जनीय आहे तो जात्या स्त्री प्रत्यय नाही. तो प्रत्यय स्त्री शब्दांना जसा लागतो तसाच पुंशब्दांनाही लागतो तेव्हा मातृशब्दाचे द्वितीयानेकवचन मातृः करून लिंगभेद दाखविण्याचा हेतू नव्हता हे स्पष्ट आहे, फक्त भेद दाखविण्याची बुद्धी होती. रै, गो, द्यो ग्लौ, नौ इत्यादी शब्दांच्या द्वितीयानेकवचनी ही भेदबुद्धी मुळीच नव्हती. या ऋकारान्त पितृमातृशब्दांच्या द्वितीयानेकवचनातच प्रथमतः ती अनुभवास येते. कालान्तराने ही भेदबुद्धीक इतकी एकपक्षी झाली की, पाणिनीकाली स्त्रीलिंगी शब्द म्हटला की त्याचे द्वितीयानेकवचन नन्त कधीच नसावयाचे, सदा विसर्जनीयान्त असावयाचे. बाकी न् चा किंवा विसर्जनीयाचा लिंगाशी काहीएक संबंध नाही हे रूपसाधनिकेवरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. पितृ व मातृ या ऋकारान्त शब्दांच्या एका रूपात फक्त भेदबुद्धीचा आभास मात्र झाला. खरी लिंगभेदबुद्धी आकारान्त, इकारान्त, उकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त शब्दांच्या चतुर्थी पंचमी, षष्ठी व सप्तमी यांच्या एकवचनी प्रत्ययात स्पष्ट दिसू लागते. तक्त्यांतील रमा व गोपा किंवा हरि व नदी, किंवा नदी व वातप्रमी यांचे भस्थानीय प्रत्यय पहा म्हणजे स्त्रीलिंगी व पुल्लिंगी भिन्न प्रत्यय संस्कृतात निर्माण झाल्याचा वास येऊ लागतो आणि ही भिन्नता कोणत्या रस्त्याने आली ते मति व धेनु आणि धी व भू या शब्दांच्या भस्थानीय प्रत्ययांवरून कळते. तक्त्यावरून दिसेल की, नदी व रमा नित्यस्त्रांप्रत्ययग्राही आहेत आणि हरिगुरु व वातप्रमीखलपू नित्यपुंप्रत्ययग्राही आहेत. या नित्यस्त्री व नित्यपुं शब्दांच्यामध्ये स्त्रीप्रत्यय व पुंप्रत्यय असे दोन्ही प्रत्यय घेणाऱ्या मतिधेनु व धीभू या जोड्या आहेत. मति शब्द एकदा पुल्लिंगी हरि शब्दाप्रमाणे चालतो आणि एकदा स्त्रीलिंगी नदी शब्दाप्रमाणे चालतो.

या दुहेरी वागणुकीचा अर्थ काय? अर्थ असा की, पूर्ववैदिकसमाजात एक समाज मति शब्द पुल्लिंगी मानी आणि दुसरा समाज स्त्रीलिंगी मानी. दोन्ही समाज एकवटल्यावर कोणी पुल्लिंगी रूपे योजीत व कोणी स्त्रीलिंगी रूपे योजीत. अशा स्थितीत वैदिकभाषा उत्पन्न झाली आणि ती भाषा बोलणाऱ्या वैय्याकरणाना दोन दोन रूपे वापरण्यात असलेली जी साक्षात आढळली ती त्यांनी प्रामाणिकपणे नमूद करून ठेविली. जुनाटभाषेच्या पहिल्या थरांत लिंगभेद नव्हता व लिंगभेददर्शकप्रत्ययही नव्हते. पुढे व्यक्ती स्त्री आहे की पुरुष आहे हे यद्यपि कळू लागले तत्रापि हा भेद प्रत्ययांनी दाखविण्याची युक्ति सुचली नव्हती. नंतर स्वतंत्र पुंप्रत्यय व स्त्रीप्रत्यय निर्माण झाले. तेव्हा कोणता शब्द पुं व कोणता स्त्री मानावा या संबंधाने निरनिराळ्या समाजाची निरनिराळी मते पडून एकच शब्द एका समाजात पुल्लिंगी तर दुसऱ्या समाजात स्त्रीलिंगी मानला गेला. नंतर या दोन समाजाचा मिलाफ झाला. मिलाफ झाल्यावर दोन्ही रूपे शिष्ट म्हणजे थट्टा न होता वापरली जाणारी रूपे समजली गेली, या दुहेरी स्वभावाचा अवशेष हे दुतोंडी शब्द होत. ही दुतोंडी रूपे पाणिनीच्याकाली प्रचलित होती. दुतोंडी शब्दांपैकी इकारान्त व उकारान्त शब्दांचा कल इकारान्त व उकारान्त पुल्लिंगी शब्दाकडे फार झुकतो व ईकारान्त व ऊकारान्त शब्दांचा कल ईकारान्त व ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्दांकडे फार झुकतो. मति व धेनु यांच्या पंचवीस रूपापैकी एकोणीस रूपे हरि व गुरु शब्दांच्या रूपासारखी आहेत. चार रूपे नदी शब्दाच्या रूपासारखी विकल्पाने आहेत व दोन रूपे नदी शब्दासारखी नित्यत्वाने आहेत. धी व भू यांच्या सव्वीस रूपापैकी फक्त चार रूपे पुल्लिंगी प्रत्यय विकल्पाने घेतात. एकवीस रूपांचा कल नदी व वधू शब्दांच्या रूपाकडे नित्यत्वाने आहे व एक रूप हलन्त शब्दांच्या रूपाचे अनुकरण करते. मति व धेनु हे शब्द घ्या किंवा धी व भू हे शब्द घ्या. यांच्या रूपापैकी चार स्थानची रूपे विकल्पाने स्त्री लिंगी किंवा पुल्लिंगी होतात ती स्थाने म्हणजे चतुर्थी, पंचमी, षष्ठी व सप्तमी, या चार विभक्त्यांची एकवचनस्थाने. म्हणजे हा विकल्पाचा चमत्कार भस्थानात घडतो. सर्वनामस्थानच्या पाच रूपात किंवा पदस्थानच्या सात रूपात घडत नाही. भस्थानीच तेवढी वैकल्पिक रूपे का यावीत? या प्रश्नाचे उत्तर असे. पूर्ववैदिक तीन भाषांचा मिलाफ होऊन वैदिकभाषा निर्माण झाली हे वारंवार आपण पहात आलोच आहोत पैकी भस्थानीय रूपे ज्या पूर्ववैदिकभाषेतून घेतली त्या पूर्ववैदिकभाषेत प्रथम पुल्लिंग व स्त्रीलिंग यांच्या प्रत्ययात भेद उत्पन्न झाला व तो भेद वैदिकभाषेत शिरला. तक्ता देतो त्यावरून स्पष्टता जास्त खुलासा होईल :